## विधानसभेत विरोधी पक्षनेत्याची नेमणूक करा..

### विजय वडेट्टीवार यांची मागणी



■ **मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेत विरोधी पक्षनेत्याची नेमणूक तातडीने करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत उपस्थित केली आहे. अधिवेशनाचे शेवटचे दोन दिवस उरले असताना संख्याबळाचा विचार न करता ही नियुक्ती व्हावी, असे त्यांनी सभागृहात मुद्दा मांडताना सांगितले. विधानसभेचे कामकाज नियमानुसार आणि पारदर्शकपणे चालावे, यासाठी विरोधी पक्षनेत्याची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

विधानसभा कामकाज कार्यपद्धतीवर बोलताना वडेट्टीवार म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच सांगितले आहे की, सत्ताधारी आणि विरोधक हे विकासाची दोन चाके आहेत. यातील एक चाक म्हणजे विरोधी पक्षनेता. सध्या हे चाक सभागृहात नाही. अधिवेशनाचे शेवटचे दोन दिवस उरले आहेत, त्यामुळे विरोधी पक्षनेत्याची नेमणूक तातडीने करावी.₹ विरोधी पक्षनेत्याची निवड होण्याची परंपरा नाही. आम्ही असा प्रकार कधी पाहिला नाही. त्यामुळे नवीन परंपरा पाडू नये, असे ते म्हणाले.

वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर टीका करताना म्हटले, महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले आहे. त्यांना लगाम घालण्यासाठी आणि महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी विरोधी पक्षनेत्याची गरज आहे. विधानसभेचे कामकाज एकतर्फी होऊ नये. अधिवेशनाच्या अंतिम आठवड्यात विरोधी पक्षनेत्याची खुर्ची रिकामी ठेऊन कामकाज चालू नये. त्यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे ही मागणी लावून धरली आणि म्हणाले, अध्यक्षांना अधिकार आहे, त्यांनी यावर निर्णय घ्यावा.

## छत्रपती संभाजी नगरात संभाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारा : आठवले



■ **मुंबई :** रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात स्वराज्याचे द्वितीय छत्रपती संभाजी महाराजांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याची आग्रही मागणी केली आहे. आज मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल येथे पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही मागणी लावून धरली. औरंगाबादचे नाव बदलून छत्रपती संभाजी नगर असे झाले असून, या जिल्ह्यात संभाजी महाराजांचे स्मारक प्रेरणादायी ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

आठवले म्हणाले, छत्रपती संभाजी महाराज हे महापराक्रमी आणि शौयार्चा महामेरू असणारे योद्धे होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या स्वराज्याच्या रक्षणासाठी त्यांनी आपले बलिदान दिले. त्यांच्या नावाने असलेल्या छत्रपती संभाजी नगरात त्यांचे भव्य स्मारक उभारले जावे. राज्य सरकारने संगमेश्वर येथे स्मारकाची घोषणा केली आहे, पण त्यासोबतच संभाजी नगरातही स्मारक व्हावे.ह्व या मागणीसाठी आपण मुख्यमंत्री आणि राज्यपालांची भेट घेणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

खुलताबाद येथील औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्द्यावरही आठवले यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, ह्वऔरंगजेबाची कबर पुरातत्व खात्याच्या ताब्यात आहे, ती काढण्याची गरज नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले स्वराज्य औरंगजेब जिंकू शकला नाही. महाराष्ट्राच्या मातीत तो गाडला गेला आहे. ही कबर छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांच्या पराक्रमाचे प्रतीक आहे. आम्ही त्याला या मातीत गाडले आहे. यावर आता वाद नको, असे आवाहन त्यांनी केले.

## सुषमा अंधारेंनी गाण्यातून डिवचले



■ **मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराचे वादग्रस्त गाणे गात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला आहे.

या प्रकरणी त्यांनी शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांचा चिमटा काढत त्यांना आता छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्या आपटे, सोलापूरकर व कोरटकर यांच्याकडे केव्हा तोडफोड करायची असा सवाल केला आहे. सुषमा अंधारे कुणाल कामराचे विडंबनात्मक गाणे गात म्हणाल्या, ठाणे की रिक्शा चेहरे पर दाढ़ी, आंखों पर चश्मा हाय ! एक झलक दिखलाए कभी, गुवाहाटी में छुप जाए। मेरी नजर से तुम देखो गद्दार नजर वो आए ठाणे की रिक्शा, चेहरे पर दाढ़ी , आंखों ओआ चश्मा हाय। मंत्री नही है वो दल बदलू हैं और कहा क्या जाए, जिस थाली में खाये उसमें ही वो छेद कर जाए मंत्रालय से ज्यादा फडणवीस की गोदी में मिल जाए।

सुषमा अंधारे पुढे म्हणाल्या, चिडचिड होत आहे? बापरे... प्रचंड चिडचिड होत आहे, तोडफोड होत आहे. पण साधा प्रश्न आहे माझा... जेव्हा भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी अत्यंत अवमानकारक वक्तव्य केली तेव्हा ही चिडचिड कुठे गेली होती? आपटेंमुळे छत्रपती शिवरायांचा पुतळा पडला तेव्हा त्या आपटेचे कार्यालय तुम्ही का फोडले नाही? सोलापूरकरचे कार्यालय किंवा ते ज्या भांडारकर ट्रस्टमध्ये होते ते तुम्ही का फोडायला गेला नाही, असेही त्या म्हणाल्या.

# सहकारी गृहनिर्माण संस्थासाठी लवकरच धोरण

### मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा




■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २४ :** सहकारी गृहनिर्माण संस्थाना सहकारात स्थान नव्हते, त्यावेळी २०१९ साली त्याकरिता स्वतंत्र चॅप्टर आम्ही केला. त्यामुळे कायद्याने आधार मिळाला. येत्या १० ते १२ दिवसात उर्वरित नियम देखील आम्ही प्रसिद्ध करू, तसेच अपार्टमेंट कायद्यात देखील येत्या महिन्याभरात आवश्यक पूर्तता करू. सहकारातून समृद्धीकडे नेण्याचे पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांचे धोरण हे स्वयंपूनर्विकासातून साध्य करण्याचा विचार आहे. स्वयंपुर्नविकास हा आणखी सोप्या पद्धतीने व्हायला हवा. त्यामध्ये सहकारातून समृद्धीकडे नेण्याचे धोरण आहे, असे मत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

पुणे जिल्हा आणि महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ, सहकारी पतसंस्था महासंघ, सहकारी बँक महासंघ यांच्यावतीने महाराष्ट्रातील गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स यांना मार्गदर्शन व सहकार्य मिळावे, यासाठी पुण्यात महाअधिवेशन आणि प्रदर्शनाचे आयोजन गणेश कला क्रीडा मंच येथे करण्यात आले होते.

समारोपप्रसंगी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, आमदार प्रवीण दरेकर, ज्येष्ठ सहकार तज्ज्ञ विद्याधर अनास्कर, आमदार हेमंत रासने, धीरज घाटे, दीपक मिसाळ, संघटनेचे अध्यक्ष सुहास पटवर्धन, सीताराम राणे, मुंबई गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश दरेकर, सचिव मनिषा कोष्टी, नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडिया नवी दिल्लीचे कार्यकारी संचालक आशिष त्रिवेदी आदी यावेळी उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, क्लस्टर पद्धतीने स्वयंपुर्ण विकास करण्याचा आमचा प्रयत्न आहे. गृहनिर्माण संस्थाना टँकरमुक्त आम्ही करू. मात्र, सोलरयुक्त संस्था हा उपक्रम सर्वत्र राबविणे गरजेचे आहे. त्याकरिता प्रधानमंत्री सूर्य धन योजनेचा संस्थानी लाभ घ्यायला हवा.

पुढील ३ महिन्यात संस्थाशी निगडित ऑनलाईन प्रणाली सुरु होत असून पुढील सहा महिन्यात व्हाट्स अँप वर सुविधा उपलब्ध होतील. यामुळे नागरिकांना हेलपाटे मारावे लागणार नाहीत, असे आश्वासनही त्यांनी दिले.

मुरलीधर मोहोळ म्हणाले, भारत हा कृषीप्रधान देश असल्याने ४० टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या सहकाराशी जोडली गेली आहे. देशात ८ लक्ष तर राज्यात २.२५ लक्ष सहकारी संस्था असून त्यातील १.२५ लक्ष गृहनिर्माण संस्था आहेत. त्यामुळे ही चळवळ मजबूत करण्याचा प्रयत्न आहे. आज ३० वेगवेगळ्या क्षेत्रात अशा पद्धतीचे काम सुरु आहे.

आशिष शेलार म्हणाले, माहिती तंत्रज्ञानाशिवाय सहकार चळवळ चालू शकत नाही. कोविड काळात गृहनिर्माण संस्थाच्या सभा या ऑनलाईन पद्धतीनेच होत होत्या. त्यामुळे यामध्ये माहिती तंत्रज्ञानाला महत्व आहे. व्यवसायिकीकरण आणि स्वायत्तता या दोन गोष्टी सहकारी संस्थांमध्ये असायला हव्या. संस्थांच्या कार्यपद्धतीवर लोकांचा विश्वास अवलंबून असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## चोरी करणारे गद्दारच : उद्धव ठाकरेंचा घणाघात



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराची जोरदार पाठराखण करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर खरमरीत टीका केली. कुणाल कामरा हा सत्यच बोलला. त्याने जनभावना मांडली. जे चोरी करतात ते गद्दारच असतात, असे ते म्हणालेत.

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याच्या एका व्यंगात्मक गाण्याचा व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. या गाण्याद्वारे त्याने शिवसेनेतील बंडखोरीवर भाष्य केले होते. विशेषतः एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता त्यांनी त्यांचा उल्लेख गद्दार असा केला आहे. यामुळे सत्ताधारी शिवसेनेचे पित्त खवळले आहे.

शिवसेना कार्यकर्त्यांनी या प्रकरणी कुणाल कामराच्या मुंबईतील खार येथील एका हॉटेलातील स्टुडिओची तोडफोड केली. तसेच त्याच्यावर गुन्हाही दाखल केला. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी त्याची पाठराखण करत एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला आहे.

उद्धव ठाकरे आज पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, महाराष्ट्राच्या जनतेपुढे मी स्पष्ट करू इच्छितो की, काल कॉमेडी शोच्या सेटची जी तोडफोड करण्यात आली, ती शिवसैनिकांकडून करण्यात आली नाही. त्याचा शिवसेनेशी कोणताही संबंध नाही. ती तोडफोड गद्दारांनी (शिंदे गट) केली आहे. आपले राज्य सध्या शिवरायांच्या आदर्शावर चाललंय की, गद्दारांच्या आदर्शावर चालले आहे?

जे भेकड लोक आहेत, ते त्यांच्या गद्दार नेत्याचा अपमान झाला म्हणून तोडफोड करत आहेत. पण या गद्दारांना छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणारा प्रशांत कोरटकर दिसत नाही, राहुल सोलापूरकर दिसत नाही. भगतसिंह कोश्यारी यांनी शिवरायांचा अपमान केला तेव्हाही या लोकांनी त्याचा निषेध केला नाही.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, एकनाथ शिंदे यांच्यावरील व्यंगात्मक टीकेनंतर ज्या लोकांनी कुणाल कामराच्या शोच्या सेटचे नुकसान केले, त्या लोकांकडून त्याची नुकसान भरपाई वसूल केली जावी. मी मुख्यमंत्री महोदयांना सांगतो की, न्याय हा सर्वांना सारखाच असला पाहिजे. नागपूरच्या दंगलीत ज्यांचे नुकसान झाले, त्यांना तुम्ही नुकसान भरपाई देण्याची घोषणा केली. तशीच नुकसान भरपाई काल कॉमेडी शोच्या सेटच्या तोडफोड प्रकरणात म्ळिाली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली.

## मध्यरात्री आग, ४ दुकाने खाक



■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. २५ :** सातपूर-अंबड लिंकरोडवरील बजरंगनगरातील फर्निचर दुकानाला भीषण आग लागल्याची घटना रविवारी रात्री १.५० वा. घडली. यात लगतच्या ३ दुकानांनाही आग लागल्याने अंदाजे १० लाखाहून अधिक रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. अग्निशमन विभागाच्या माहितीनुसार ७ बंबांच्या सहाय्याने ३.३० वाजता आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.

या भागात मोठ्या संख्येने फर्निचर, लाकडी वस्तूंची दुकाने आहेत. मात्र, कुठेही सुरक्षा साधनांचा वापर केला जात नसल्याचे दिसून आले आहे. आग लागली त्या दुकानामागे प्लास्टिक व भंगारची दुकाने असून सुदैवाने तेथपर्यंत आग पोहोचली नाही. अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती.

## अमोल मिटकरी यांचा हल्लाबोल

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २५ :** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी आज स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा आणि प्रशांत कोरटकर प्रकरणावरून विरोधकांवर जोरदार टीकास्त्र सोडले. कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सादर केलेल्या विडंबनात्मक गाण्यामुळे शिंदे गटाच्या शिवसैनिकांनी स्टुडिओची तोडफोड केली, तर प्रशांत कोरटकर छत्रपती शिवाजी महाराजांवरील आक्षेपार्ह वक्तव्यांमुळे चर्चेत आहे. या दोन्ही घटनांवर मिटकरी यांनी आपली भूमिका मांडताना विरोधकांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलण्याचे आवाहन केले.

मिटकरी म्हणाले, विरोधक अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गप्पा मारत आहेत, पण कुणाल कामराने पातळी सोडून वक्तव्य केले आहे. त्यामुळे शिवसैनिकांची तोडफोड साहजिक आहे, पण मी हिंसेचे समर्थन करत नाही. विरोधकांनी यावर गप्पा मारण्यापेक्षा शेतकऱ्यांचे प्रश्न मांडावेत. आगीत तेल टाकण्याचा प्रयत्न करू नये. त्यांनी कुणाल कामराच्या गाण्यामुळे जनतेचे महत्त्वाचे विषय मागे पडत असल्याची खंतही व्यक्त केली.

प्रशांत कोरटकर प्रकरणावर बोलताना मिटकरी यांनी गृहमंत्रालय आणि नागपूर पोलिसांवर गंभीर आरोप केले. कोरटकर नागपूरमधून पोलिसांच्या सहाय्याने पळाला आहे. सोमय्या यांना बांगलादेशी सापडतात, पण कोरटकर भेटत नाही. त्याचा फोन मिळतो, पण तो सापडत नाही. नागपूर पोलिसांना तो का दिसत नाही? गृहमंत्रालयाने आकाश-पाताळ एक करून पकडणार असे सांगितले, मग तो जामिनावर कसा बाहेर पडला? कोणाच्या साहाय्याने पडला? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

मिटकरी यांनी सरकारने कोरटकरला जमीन मिळू नये म्हणून याचिका दाखल केल्याचे सांगत, त्याचा जामीन नामंजूर झाल्याचा उल्लेख केला. सर्व पोलिस चुकीचे नाहीत, पण जे कोरटकरसोबत आर्थिक सेटलमेंट करून बसले असतील, त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करा, अशी मागणीही त्यांनी केली.

छत्रपती संभाजीराजे यांनी वाघ्या कुत्र्याच्या इतिहासाबाबत उपस्थित केलेल्या शंकांवर मिटकरी म्हणाले, संभाजीराजेंच्या मनात शंका आहे, ती मुख्यमंत्री दूर करतील. वाघ्याबाबत एका ऐतिहासिक समितीने सत्य समोर आणावे. मी इतिहासाचा अभ्यासक नाही, पण वाचक आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे निधन झाले तेव्हा संभाजी महाराज पन्हाळ्यावर होते. त्या काळात पती गेल्यावर सती जाण्याची प्रथा होती, पण वाघ्याचा कुठेही उल्लेख नाही. संभाजीराजेंना संभ्रम असेल, तर सरकारने तो दूर करावा. आता हा विषय महत्त्वाचा नाही, पण नंतर यावर चर्चा व्हायला हवी, असेही मिटकरी म्हणाले.

## अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा दुरुपयोग : उदय सामंत



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :** शिवसेना (शिंदे गट) नेते आणि राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सादर केलेल्या विडंबनात्मक गाण्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कामराच्या या कृतीला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा दुरुपयोग ठरवत सामंत यांनी शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर राखण्याची मागणी केली. तसेच, या प्रकरणामागे ह्वप्लांटह्व असल्याचा संशय व्यक्त करत त्यांनी कठोर कारवाईची गरज असल्याचे मत मांडले.

पत्रकार परिषदेत बोलताना उदय सामंत म्हणाले, अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावावर कोणालाही काहीही बोलण्याचा अधिकार नाही. कोणाच्या तरी सांगण्यावरून गाणे बनवणे हे अभिव्यक्ती स्वातंत्र्यात बसत नाही. आमच्या नेत्यावर कोणी बोलत असेल, तर आमच्या शिवसैनिकांचे शिंदे साहेबांवर जे प्रेम आहे, ते व्यक्त होणारच. कामरा कोणासोबत बसला आहे, काय सुरू आहे हे पाहिले पाहिजे. असे वक्तव्य करायला नको होते. जे मागे आहेत, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. त्यांनी पुढे सांगितले की, मी मंत्री होण्यापूर्वी एक शिवसैनिक आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी शिकवले आहे की अन्यायावर पेटून उठले पाहिजे. शिंदे साहेबांवर टीका झाल्याने शिवसैनिक दुखावणारच.

सामंत यांनी गुलाबराव पाटील यांच्या आक्रमक वक्तव्याचे समर्थन करत म्हटले, कलाकाराचा आम्हाला अभिमान आहे, पण आमच्या नेत्यावर टीका होत असेल तर गुलाबराव पाटील यांनी जे बोलले, त्यासोबत आम्ही आहोत. त्यांनी शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी अंधेरीतील स्टुडिओवर केलेल्या तोडफोडीचे अप्रत्यक्ष समर्थन केले, परंतु कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारीही अधोरेखित केली. ₹बोलवता धनी एकच असू शकत नाही, अनेक असू शकतात. पण यातून कायदा-सुव्यवस्था बिघडली तर पुन्हा टाहो फोडायचा का? असे ते म्हणाले.

**१०० टक्के प्लांट, संविधान आम्हीही मानतो...**

कामराच्या गाण्यामागे राजकीय षडयंत्र असल्याचा दावा करत सामंत म्हणाले, ₹शिंदे साहेबांवर टीका केल्यावर ठाकरे आणि राऊत समर्थनच करणार. हे १०० टक्के प्लांट आहे. कामरा जर संविधानाची प्रत दाखवत असेल, तर आम्हीही संविधान मानणारे आहोत. कामराने आपल्या गाण्यानंतर संविधानाचा फोटो सोशल मीडियावर पोस्ट केला होता, यावरही सामंत यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले.

### रायगडावरील वाघ्या कुत्र्याची समाधी हटवा : संभाजीराजे

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :** रायगडावरील वाघ्या कुत्र्याची समाधी हटवा, अशी मागणी युवराज संभाजीराजे छत्रपती यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. संभाजीराजे यांनी एक पत्र लिहून आपली सविस्तर भूमिका विशद केली.

रायगडावरील वाघ्या कुत्र्याची समाधी हे अतिक्रमण आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत एका कपोलकल्पित कुत्र्याची समाधी व पुतळा उभारणे हे महाराष्ट्राचे दुर्दैव, श्रध्देची कुचेष्टा व महान युगप्रवर्तक श्री छत्रपती शिवाजी महाराजांची घोर प्रतारणा असल्याचे म्हटले आहे. ही समाधी हटवावी, अशी मागणी संभाजीराजे यांनी केली आहे.

## सरकारला तळतळाट लागेल...

### जितेंद्र आव्हाड सभागृहात आक्रमक, सरकारवर निशाणा



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २५ :** पाशवी बहुमत मिळाल्यामुळे लोकशाहीवर बलात्कार करण्याचा अधिकार आपल्याला मिळाला आहे, असे सरकारला वाटत असल्याचे टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली.

विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना जितेंद्र आव्हाड यांनी सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणासह विविध मुद्द्यांवरून सरकारला धारेवर धरले. बेशरमपणे पोलिसांना पाठबळ देणाऱ्या सरकारला सोमनाथ सूर्यवंशीच्या आईचा तळतळाट लागेल, असे विधान त्यांनी केले. जितेंद्र आव्हाड यांनी संतोष देशमुख प्रकरणावरूनही सरकारवर टीकास्त्र सोडले.

सोमनाथ सूर्यवंशी याचा मृत्यू पोलिस कोठडीत होऊनही कोणावरही कारवाई झालेली नाही. या सरकारला गरिबांची जाण नाही का? मग त्यांनी न्याय कोणाकडे मागायचा? असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी सभागृहात उपस्थित केला. राज्य सरकारने सोमनाथ सूर्यवंशीच्या मृत्यूचे कारण सांगावे.

मात्र, सरकार बेशरमपणे पोलिसांच्या पाठीशी उभे राहत आहे. या सरकारला सोमनाथ सूर्यवंशीच्या आईचा तळतळाट सहन करावा लागेल, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, एखाद्या सरकारला पाशवी बहुमत मिळते तेव्हा पाशवी बलात्कार होत असतात. हे सहन करण्याची ताकद तुम्ही ठेवा. विरोधी पक्षाला काही किंमत द्यायची नाही, म्हणून सभागृहात समोर कोण बसत नाही.

त्याच्या हातात हातकड्या असताना त्यांनी पिस्तुल खेचण्याचा प्रयत्न कसा केला? पीएसआय अधिकारी आतमध्ये बसतो. जर असे एन्काउंटर होणार असतील तर न्यायपालिकेचे महत्त्व काय? असा प्रश्न जितेंद्र आव्हाड यांनी केला. सोमनाथ सूर्यवंशी याचा मृत्यू पोलिस कोठडीत झाला. मात्र, कोणावरही कारवाई झाली नाही. सरकार बेशरमपणे पोलिसांच्या मागे उभे राहत आहे, असा हल्लाबोल जितेंद्र आव्हाड यांनी सभागृहात बोलताना केला.

जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी बोलताना संतोष देशमुख हत्या प्रकरणावरूनही सरकारवर निशाणा साधला. संतोष देशमुख यांची हत्या झाली. जोपर्यंत फोटो समोर येत नव्हते, तोपर्यंत कारवाई होत नव्हती. फोटो कसे बाहेर आले, यावर मला बोलायचे नाही. फोटो समोर आले नसते तर धनंजय मुंडेंचा राजीनामा झाला नसता, अशी टीका जितेंद्र आव्हाड यांनी सरकारवर केली. शंभर जण सांभाळण्यापेक्षा वाल्मीक कराडला सांभाळ तुम्हाला त्रास होणार नाही, असे सुदर्शन घुले कंपनीला सांगतो. एक वाल्मिक कराड बीडमध्ये आहे. मात्र, असे अनेक वाल्मीक प्रत्येक जिल्ह्यात आहे. अरे तुम्हाला तो आंधळे सापडत नाही. प्रशांत कोरटकर तुमच्या नजरेखालून दुबईला पळून जातो आणि तुम्ही एआय इंटलिजन्सच्या बाता मारता, अशा शब्दांत आव्हाड यांनी सुनावले.

जितेंद्र आव्हाड यांनी राजापूरमधील दर्गा जाळपोळ घटनेचा देखील उल्लेख केला. ज्या राजापूरने यापूर्वी कधीही हिंदू- मुसलमान वाद बघितला नाही. त्याच राजापूरमध्ये चार जण जाऊन दर्गा जाळतात. एक मंत्री उठतात, बाहेर जातात आणि आग लावण्याचा प्रयत्न करतात, असे ते म्हणाले.

# स्वातंत्र्य लढ्यातील अनेक वीरांच्या योगदानाचा विसर




■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २४ :** देशाच्या स्वातंत्र्यसमरात योगदान दिलेल्या लाखो वीरांचे आपल्याला विस्मरण झाले असून ढाली तलवारीविना स्वातंत्र्य मिळाले असा खोटा प्रचार अनेक वर्षे रुजवल्याने असंख्य स्वातंत्र्यवीरांची अवहेलना झाल्याचे मत पतितपावन संघटनेचे महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष सोपानराव देशमुख यांनी जाहीर सभेत व्यक्त केले.

कसबा पेठेत झालेल्या जाहीर सभेत थोर शहीद क्रांतिकारी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरूंना त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करताना देशमुख यांनी सात लाख बत्तीस हजार तरुण असेच हुतात्मे झाले का, असा प्रश्न उपस्थित केला. तसेच स्वातंत्र्यसैनिकांच्या अप्रकाशित योगदानाचा आपल्या भाषणात उल्लेख केला.

भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरूंना फाशी दिलेला दिवस पतितपावन संघटना तसेच अनेक हिंदुत्ववादी संघटना क्रांती दिवस म्हणून साजरा करतात.यावेळी बोलताना देशमुख म्हणाले, भारत ही क्रांतीची भूमी असून ज्ञानदेवापासून सुरू झालेली क्रांतीची परंपरा समर्थ ते जगद्गुरु तुकारामांपर्यंत अखंड तेवत राहिली. छत्रपती शिवराय ते मंगल पांडे आणि झाशीची राणी ते महात्मा फुले आणि क्रांतीवीर लहुजी वस्ताद यांच्यापर्यंत हा प्रवास अखंड सुरू राहिला. मात्र मोठे योगदान देऊनही स्वातंत्र्यवीर सावरकर आणि डॉ आंबेडकर यांची अवहेलना झाली, देशाच्या ध्वज भगवा करण्याचे आणि संस्कृतला राष्ट्रभाषा बनवण्याचे महापुरुषांचे प्रयत्न हाणून पाडण्यात आले . ब्रिटिशधार्जिण्या आणि अत्याचारी आक्रमकांना आपण इतिहासात नायक बनून ठेवले आहे, असा आरोपही देशमुख यांनी केला.

प्रदेश सरचिटणीस नितीन सोनटक्के म्हणाले, काँग्रेसने हिंदुत्ववादी संघटनांना बदनाम करुन बंदी आणल्याचा आरोप केला. राजकीय हिंदुत्त्व टिकवले पाहिजे अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे सहकार्यवाह प्रसाद लवळेकर म्हणाले, भगतसिंग, सुखदेव राजगुरू यांचा इतिहास हा परीक्षेतील दोन मार्कांचा इतिहास राहता कामा नये.

खरा इतिहास लोकांपर्यंत पोहोचला पाहिजे. हुतात्मा शूरवीरांच्या त्यागाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याच्या हेतूने सभेचे आयोजन केले असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. प्रदेश प्रवक्ते अली दारूवाला यांनी यावेळी उपस्थितांचे आभार मानले.



# सम्यक नागरिक सहकारी पतसंस्थेत कोट्यावधीचा घोळ

## फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात धडक मोर्चा

### नागरिकांचा आरोप

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.24 )** - शहरातील शांतीनगर येथील सम्यक नागरिक सहकारी पतसंस्था कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहारामुळे बंद पडली असून, ठेवीदारांच्या पैशांची परतफेड न करता फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सोमवारी (दि.23) फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनमध्ये पतसंस्थेच्या ग्राहकांनी धडक देत दोषींवर कारवाई करण्याची आणि आपले पैसे परत देण्यात यावे, अशी मागणी केली. दरम्यान पोलीस प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेतली आहे.

या पतसंस्थेच्या महिला कॅशियर यांनी बनावट पुस्तके छापून अवैध वसुली केली आणि अनेक ग्राहकांना त्यांच्या ठेवी परत दिल्या नाहीत, असा आरोप आहे. गेल्या दोन-तीन वर्षांपासून ग्राहकांना पैसे मिळत नसल्याने संतप्त ठेवीदारांनी सोमवारी (दि.24) फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात धडक दिली. या प्रकरणातील दोषी व जबाबदार असलेल्या आरोंपीवर तातडीने कारवाई करण्यात येऊन पैशांची परतफेड करण्यात यावी, अशी मागणी भीम बिग्रेड संघटनेच्या नेतृत्वात शेकडो नागरिकांनी केली. यावेळी राजेश वानखडे यांच्यासह विक्रम तसरे, अमित कुळकर्णी, प्रविण मोहोड, अविनाश धुर्वे, ज्ञानेश्वर रंगारी, शुभम राऊत, उमेश कांबळे, सागर वर्धे, साहेल खान, रोशन गवई यांच्यासह मोठ्या संख्येत फसवणुक झालेले पतसंस्थेचे सभासद हजर होते.

### पाच वर्षांपासून सुरु होता प्रकार

पतसंस्थेमध्ये नागरिक नियमितपणे पैसे जमा करत होते. हा प्रकरा जवळपास पाच वर्ष चालला. दरम्यान महिला कॅशिअर यांनी डुब्लीकेट पासबुक छापून ग्राहकांकडून वसूली केल्याचा आरोप नागरिकांनी यावेळी केला. शेकडो नागरिकांनी लाखो रूपये या पतसंस्थेत एफडी म्हणून जमा केले होते.मात्र नागरिक जेव्हा पैसे मागायला पतसंस्थेच्या कार्यालयात गेले तेव्हा त्यांना हा घोळ समजला.त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी,अशी मागणी नागरिकांनी आता केली आहे.

# यवतमाळ येथील प्राध्यापकाची धामणगांव रेल्वे येथे आत्महत्या

**बडनेरा रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रीया सुरु | काल संध्याकाळी त्यांच्या घरी आलेले ते 5 दुपट्टाधारी कोण?**

### सुसाईड नोटमध्ये 32-34 लोकांची नावे ?



**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.24 )** - यवतमाळ येथील लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या एका प्राध्यापकाने काल रविवारी (दि.23) मध्यरात्री धामणगाव रेल्वे येथील रेल्वे स्टेशनला रेल्वे पुढे उडी घेत आत्महत्या केली. हा प्रकार सोमवारी (दि.24) सकाळी उघडकीस आला. यातील मृतकाकडे मृत्यू पूर्व लिहीलेल्या एका सुसाईट नोटमध्ये आत्महत्येला कारणीभूत तब्बल 32 ते 34 जणांची नावे लिहीलेली आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. घटनास्थळ हे बडनेरा रेल्वे पोलीसाच्या हद्दीत येत असल्याने सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. तर मृत्यूपूर्व चिठ्ठी जप्त केल्याचे स्थानिक रेल्वे पोलीसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार धामणगांव रेल्वे रल्वे आज सकाळी उघडकीस आलेल्या सदर आत्महत्या प्रकरणातील मृतकाचे नाव संतोष भास्कर गोरे (वय 54) असुन ते यवतमाळ येथील लोकनायक बापूजी अणे महीला महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे प्राध्यापक होते. काल मध्यरात्री 11.30 ते 12 च्या सुमारास ते दुचाकीने यवतमाळ येथुन धामणगाव कडे निघाले. धामणगांव रेल्वे स्थानकावर त्यांनी रात्री 1.45 - 2 च्या सुमारास प्लॅटफॉर्म तिकीट घेतल्याची नोंद आहे.

त्यानंतर येणाऱ्या मालगाडीखाली उडी घेत रात्री आत्महत्या केल्याचे सकाळी उघडकीस आले. मृतदेहानजिक सुसाईड नोट मिळाली सदर प्रकरणी धमणगांव रेल्वे पोलीसांनी मृतदेहाचा पंचनामा करुन उत्तरीय तपासणीकरीता ग्रामीण रुग्णालयात पाठविला. उत्तरीय तपासणी नंतर मृतदेहावर यवतमाळ येथील हिंदू स्मशानभुमीत अत्यंसंस्कार करण्यात आले. सदर प्रकरणी मृतकांच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु असुन अधिक तपास बडनेरा रेल्वे पोलीस करीत आहे.

#### आत्महत्येस कॉलेजमधील प्रकरणाची किनार

एकीकडे लोकनायक बापुजी अणे महीला महाविद्यालयात कार्यरत असलेल्या प्राध्यापक संतोष भास्कर गोरे यांच्या आत्महत्येस 1 महिन्या पुर्वीचे उपोषण व कॉलेज मध्ये घडलेल्या प्रकरणाची किनार असल्याचे बोलल्या जात आहे. एका महिन्यापुर्वी झालेल्या उपोषणानंतर एका महिलेने प्रा. गोरे विरुध्द महाविद्यालय प्रशासनाकडे तक्रार केली होती. सदर प्रकरणी चौकशी समिती गठीत करण्यात आली असुन त्याचा निर्णय दोन दिवसांपुर्वी लागला. तर दुसरीकडे काल सायकाळी त्यांच्या घरी तोंडावर दुपट्टा बांधुन 4 ते 5 जण आले असल्याचे सीसीटीव्ही मध्ये आढळून आल्याचे बोलल्या जात आहे. सदर 4 ते 5 लोक गेल्यानंतर प्राध्यापक अस्वस्थ झाले असुन त्यांनतर मध्यरात्री त्यांनी धामणगांव रेल्वे येथे येत आत्महत्या केली.

#### मृत्यूपूर्व चिठ्ठी दाखविण्यास पोलीसांची टाळाटाळ?

एकीकडे लोकनायक बापुजी अणे महीला महाविद्यालयात कार्यरत असलेल्या प्राध्यापक संतोष भास्कर गोरे मृत्यूपूर्व चिट्टी लिहून ठेवली असुन ती रेल्वे पोलीसांनी जप्त केली. मात्र सदर मृत्यूपूर्व चिठ्ठी नातेवाईकासह प्रसार माध्यमांना दाखविण्यात रेल्वे पोलीस प्रशासन टाळाटाळ करीत असल्याने नातेवाईकांचा रोष वाढला होता. निष्पक्ष तपास करीत असतांना मृत्यूपूर्व चिठ्ठी दाखविण्यास टाळाटाळ का? असा सवाल लावून धरल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता.

#### गोरेंविरुध्द महिलेची तक्रार होती

कॉलेज प्रशासनाकडे एका महीलेने प्रा. संतोष गोरे यांचे विरुध्द तक्रार केली असुन सदर तक्रारीनुसार चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशीत प्रा. गोरे यांना क्लिन चिट देण्यात आली असुन त्यांनी माफी सुध्दा मागितली होती. त्यामुळे ते प्रकरण तेथेच संपले होते.

**दुर्गेश कुंटे,**
**प्राचार्य लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय.**

# पॅरोलवर सुटलेला कैदी फरार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.24 )**-पॅरोलवर सुटलेला जन्मठेपेचा कैदी फरार झाला. ही घटना 23 मार्च रोजी तळेगाव दशासर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी मध्यवर्ती कारागृहातील पोलीस शिपायाच्या तक्रारीवरून फरार कैदी भीमराव मारोती अवथरे (43, रा. हिरपूर, धामणगाव रेल्वे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

भीमराव मारोती अवथरे याच्याविरुद्ध सन 2018 मध्ये खून, जमाव जमविणे, खुनाचा पुरावा नष्ट करणे व कट रचणे अशा विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. 20 जानेवारी 2020 रोजी त्याला यवतमाळच्या जिल्हा व सत्र न्यायालय तथा अतिरिक्त सत्र न्यायालयाने जन्मठेप, 5 हजार 500 रुपये दंड व दंड न भरल्यास 1 वर्ष 3 महिने अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावली होती. ही शिक्षा भोगण्यासाठी त्याला अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहात पाठविण्यात आले होते. दरम्यान, शिक्षा भोगत असताना कैदी भीमराव याने कारागृह प्रशासनाकडे आपल्याला अभिवचन रजेवर सोडण्यात यावे, असा अर्ज केला होता. त्यानुसार त्याला रजेवर सोडण्यात आले. रजेचा कालावधी संपल्यावर त्याला 21 मार्च रोजी अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहात परतणे गरजेचे होते. मात्र, तो वेळेवर कारागृहात परतला नाही. त्यामुळे मध्यवर्ती कारागृहातील पोलीस शिपाई मंगेश सोळंके (32) यांनी तळेगाव दशासर ठाण्यात तक्रार दाखल केली.



# दहा वर्षापासून फरार आरोपी अखेर जाळ्यात

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.24 )**- सन 2015 मध्ये कलम 409,420 अन्वयेनुसार दाखल गुन्ह्यात आरोपीला पोलिसांनी दहा वर्षानंतर अखेर अटक केली. नंदनसा मगनसा उइके (वय 58 रा.दुनी ता.धारणी) असे अटक आरोपीचे नाव आहे. आरोपीने दुनी येथे पोस्टमास्टर पदावर असताना ताब्यातील मुद्रांक व नगदी असा एकूण दोन लाख 73 हजार रुपयांचा अपहार केला होता. ही कारवाई ठाणेदार अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनात सतीश झाल्टे, अनंत हंकारे, पोलीस अंमलदार नितीन बोरसिया मोहित आकाशे, जगत तेलगोटे, रितेश देशमुख यांच्या पथकाने केली.

# जवाहर नवोदय विद्यालयाच्या परिसरात आग

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.24 )** - नवसारीतील जवाहर नवोदय विद्यालयाच्या मागील परिसरात सोमवारी दुपारी 3 वाजता आग लागल्याने खळबळ उडाली होती. या आगीत परिसरातील झाडे आणि गवत जळून खाक झाले. अग्निशमन दलाने तात्काळ आगीवर नियंत्रण मिळविले. त्यामुळे ही आग वसतिगृह, शाळा, कार्यालयापर्यंत पोहोचू शकली नाही.



नवसारीतील जवाहर नवोदय परिसरातील रिकाम्या जागेत झाडे आणि गवत वाढले आहे. सोमवारी अचानक गवताला आग लागली. गवतामुळे ही आग पसरत होती. दरम्यान या घटनेची माहिती शाळा प्रशासनाने तात्काळ महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाला दिली. त्यानंतर अवघ्या 5 मिनिटांत घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी आग आटोक्यात आणली.

या आगीत झाडे आणि गवत आगीत जळून खाक झाले. सुदैवाने कोणताही मोठा अपघात झाला नाही. जर आग पसरली असती तर वसतिगृह, शाळा आणि कार्यालय जळून खाक झाले असते. आग विझविण्यासाठी अधीक्षक केंद्रे, फरहान, वरघाट, नावेद खान, कोल्हे, घाटे, मोहन वानखडे, दंडे, दहातोंडे यांनी परिश्रम घेतले.

# पतीची पत्नीला बॅटने मारहाण

**अमरावती** - दारूड्या पतीने पतीला बॅटने मारहाण करून जखमी केले. ही घटना ब्राह्मणवाडा थडी ठाण्याच्या हद्दीत 23 मार्च रोजी उघडकीस आली. बेलमंडळी येथील रहिवासी अनिल रामराव अखंडे (37) हा मद्यधुंद अवस्थेत घरी गेला. त्याने पत्नीला तू नर्मदा हिचे घरी मय्यतमध्ये का गेली होती, अशी विचारणा करून त्यांना शिवीगाळ केली. तसेच त्यांना बॅटने मारहाण करून जखमी केले. त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी पीडितेने ब्राह्मणवाडा थडी ठाण्यात तक्रार दाखल केली.

# 30 वर्षापासून फरार आरोपी अटकेत



**महासागर प्रतिनिधी**

**वलगाव,( दि.24 )** - वलगाव पोलीस स्टेशनअंतर्गत चोरी प्रकरणात 30 वर्षापासून फरार एका आरोपीला पोलिसांनी अटक केली.

छोटेलाल रामनाथ यादव ( वय 70 वर्षे रा.जलाराम नगर, अमरावती) असे अटक आरोपीचे नाव आहे. हा आरोपी एका चोरी प्रकरणात 30 वर्षापासून फरार होता. न्यायालयाने वारंवार समन्स बजावूनही आरोपी न्यायालयात हजर राहत नसल्याने पोलीस या आरोपीचा पाळतीवर होते. सदर आरोपी उत्तर प्रदेश येथे राहत होता. गोपनिय माहीतीच्या आधारावर हा आरोपी अमरावतीमध्ये आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी शिताफीने या आरोपीला अटक करुन न्यायालयात हजर केले. ही संपूर्ण कार्यवाही पोलिस निरीक्षक वैभव पानसरे यांचे मार्गदर्शन पोलीस कर्मचारी शेषराव नेमाने, तौसीफ अली, महादेव कास्देकर आदींनी केली.

# आरोग्यमंत्र्यांकडून मेळघाटातील आरोग्य यंत्रणेची झाडाझडती

**आरोग्य यंत्रणा सतर्क | दुर्गम भागातील उपकेंद्रावर एक दिवस आधीपासूनच अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती**





**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.24 )**- मेळघाटातील आरोग्यविषयक समस्या जाणून घेण्यासाठी दौरा करण्यात आला. त्यानुसार आज दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण आरोग्य केंद्रांना भेटी देण्यात आल्या. या माध्यमातून नागरिकांच्या आरोग्यविषयक असलेल्या समस्या जाणून घेण्यात आल्या. येत्या काळात मेळघाटात आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहे, असे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर यांनी सांगितले.

मंत्री प्रकाश आबिटकर यांचे उशिरा रात्री आगमन झाले. त्यांनी सकाळी दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र हतरु गाठले, त्या ठिकाणच्या आरोग्य यंत्रणेची झाडाझडती घेतली. या ठिकाणच्या पाण्याची, वीजेची समस्या व सोलर सिस्टीम बंद होती. तसेच इतर समस्या जाणून घेतल्या. या ठिकाणचे आदिवासी बांधवांची थेट चर्चा केली. तसेच आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून समस्या जाणून घेतल्या. या ठिकाणच्या पाण्याची समस्या तत्काळ सोडून सोडवावी, तसेच विजेची समस्या सुद्धा सोडवावी असे आदेश आरोग्यमंर्त्यांनी दिले. या ठिकाणी बऱ्याचश्या त्रुटी आढळल्या. त्या तत्काळ पूर्ण कराव्यात उमेद गटातील आदिवासी बांधवांना उत्कृष्ट अशी आरोग्य सुविधा पुरवाव्यात असे आदेश आरोग्य मंत्री यांनी प्रशासनाला दिले. यावेळी हतरु ग्रामपंचायतचे सरपंच सुमित्रा बेठेकर उपसरपंच भैय्यालाल मावसकर उपस्थित होते. त्यांनी या ठिकाणच्या समस्या आरोग्यमंर्त्यांना सांगितल्या. यासह आरोग्यमंर्त्यांनी हिल्डा, खारी, बिबा, बारुगव्हाण, जारिदा, चुरणी,काटकुंभ इत्यादी गावांना भेटी देऊन त्या ठिकाणचे आरोग्य समस्या जाणून घेतल्या. त्या ठिकाणच्या आदिवासी बांधवांची थेट संवाद साधून समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर त्यांच्यासोबत दौऱ्या दरम्या मेळघाट चे आमदार केवलराम काळे, चिखलदराचे तहसीलदार जीवन मोरणकर, चिखलदरा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकडे, तालुका वैद्यकीय अधिकारी आदित्य पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी प्रविण पारिसे , तसेच आरोग्य विभागाची सर्वच अधिकारी या दौऱ्यामध्ये उपस्थित होते.

#### आरोग्य मंत्री संतापले

हतरु प्राथमिक आरोग्य केंद्र येथील असुविधा पाहून महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री चांगलेच संतापले. मी या ठिकाणी येणार हे माहीत असून सुद्धा या ठिकाणी विजेची, पाण्याची व्यवस्था सुविधा या ठिकाणी उपलब्ध करण्यात आल्या नाही. तसेच सोलर चे लाईट सुद्धा बंद आहे. दरम्यान त्यांनी तालुक्यातील हिल्डा, बारूगव्हाण या सह चुरणी ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन त्या ठिकाणची पाहणी केली. या ठिकाणी सुद्धा अनेक कर्मचारी अधिकारी उपस्थित राहत नाही, असे उपस्थित नागरिकांनी सांगितले. आरोग्य मंर्त्यांनी त्यांची सुद्धा कान उघाडणी केली. दौऱ्या दरम्यान अनेक अधिकाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार असून अनेक अधिकारी धास्तावले आहेत.

महाराष्ट्र राज्याचा आरोग्य मंत्री म्हणून जबाबदारी आहे. त्यामुळे मेळघाटात कुपोषण माता मृत्यू, बालमृत्यू मोठ्या प्रमाणात आहे. या समस्या सोडवण्याचे उद्देशाने मेळघाटला भेट दिली. या समस्या सोडवण्यासाठी आपला प्रयत्न राहील.

**प्रकाश आबिटकर,**
**आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री,महाराष्ट्र राज्य.**


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे 'मोहन गुलाबराव चौधरी' यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन - मौजे तोंडगाव, ग्रामपंच्यायत जुना मालमत्ता क्रं. 381 नवीन मालमत्ता क्रं. 612. ता. चांदूर बाजार, जिल्हा. अमरावती.

चर्तुः सीमाः पूर्व- रामकृष्ण वीचे यांचे घर उत्तर - काशिनाथ नांदुरकर
पश्चिम- काशिनाथ नांदुरकर दक्षिण- रस्ता

सदर मिळकत नामे 'मोहन गुलाबराव चौधरी' यांना ग्रामपंच्यायत तोंडगाव यांचा तपशील आणि गाव नमूना 8 नुसार त्यांच्या मालकीची आहे. तसेच वरील वर्णनाची नमूद मालमत्ता ही वडीलोपार्जित आहे. त्यानंतर त्यांनी "PIRAMAL CAPITAL & HOUSING FINANCE LTD. BR AMRAVATI. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केलेला आहे. वरील नमूद मालमत्ता कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी/पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमत्तेवीषयी शासकीय-नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. नं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 (सात) दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती
मो. नं. 9823698745


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# कृषीपंपाच्या वीज पूरवठ्यात अनियमितता

## संतप्त शेतकऱ्याचे बेमुदत उपोषण

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे,( दि.24 )** – धामणगाव रेल्वे तालुक्यातील बोरगाव निस्ताने सह परिसरात महावितरणातर्फे कृषी पंपांना होत असलेल्या वीज पूरवठ्यात मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याने शेतकर्यांसमोर अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकर्यांतनी नियमित वीज पूरवठा करण्याच्या मागणीसाठी पाच दिवसांपासून बेमुदत उपोषणाला सुरुवात केली आहे. शेतकरी सुनील मनोहर भोयर यांनी या आंदोलनाला सुरुवात केली होती, आता त्याला तालुक्यातील शेतकर्यांकडून मोठा पाठिंबा लाभत आहे. वारंवार ट्रान्सफार्मर जळण्याच्या प्रकारांमुळे ही समस्या निर्माण झाली असून त्यासाठी महावितरणचा बेजबाबदारपणा कारणीभूत असल्याचा आरोप शेतकर्यांमनी केलो आहे. महावितरणच्या कार्यालयासमोर हे उपोषण सुरु आहे.



सुनील भोयर व शेतकऱ्यांनी महावितरणकडे अन्य मागण्याही केल्या आहेत. त्यात सततच्या ट्रान्सफॉर्मर जळण्यामुळे झालेल्या नुकसानीसाठी 5 लाख रुपयांची भरपाई द्यावी, उच्च दाब वितरण प्रणालीऐवजी लघुदाब वाहिनीचे कनेक्शन तातडीने देण्यात यावे या मुख्य मागण्या आहेत. तीन महिन्यांत पाच ट्रान्सफॉर्मर जळाल्यामुळे शेतकर्यांतच्या हरभरा, गहू व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. परंतु, महावितरणकडून या प्रश्नावर कोणतेही ठोस पाऊल उचलण्यात आलेले नाही. या आंदोलनास शेतकरी संघटनांचा मोठा पाठिंबा मिळत असून, लवकरच यावर तोडगा निघाला नाही तर तालुक्यातील शेतकरी एकवटून तीव्र आंदोलन उभारणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. महावितरणने तातडीने लक्ष घालून लघुदाब वाहिनीचे कनेक्शन देण्याची प्रक्रिया सुरू करावी अन्यथा संपूर्ण गावातील शेतकरी महावितरणच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करणार असल्याचे सांगण्यात आले आहे. यासंदर्भात महावितरणच्या अधिकार्यांरनी सांगितले की, लवकरच वरिष्ठ अधिकार्यांशी चर्चा करून योग्य ती कार्यवाही केली जाईल. परंतु, प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. या प्रकरणामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढत असून, वीजपुरवठा सुरळीत मिळावा यासाठी अनेक ठिकाणी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. शासनाने आणि महावितरणने वेळीच योग्य तो निर्णय न घेतल्यास शेतकर्यांयचे आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

# तहसीलदारांसह नायब तहसीलदारांना नोटीस

## विलंबाने जन्म - मृत्यूचे नोंदी प्रकरण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.24 )**– विलंबाने देण्यात आलेल्या जन्म–मृत्यूचे प्रकरणातील अनागोंदी आता चव्हाट्यावर आलेली आहे. त्यातच अधिकार नसताना नायब तहसीलदारांनी दिलेले पाच हजारांवर प्रमाणपत्र 17 मार्चला शासनाने रद्द केल्याने प्रकरण तापले आहे. आता जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वच म्हणजे 14 ही तहसीलदार व 5 तालुक्यातील नायब तहसीलदार यांना गुरुवारी उशिरा 'शो कॉज नोटीस% बजावली आहे.

अधिसूचनेनुसार आदेश निर्गमित करताना तहसीलदार यांनी अपूर्ण दस्तऐवजाचे आधारे तसेच सादर दस्तऐवजाची पडताळणी व शहानिशा न करता प्रमाणपत्र वितरित केल्याचा ठपका नोटीसमध्ये करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने 24 तासाचे आत लेखी स्पष्टीकरण जिल्हाधिकाऱ्यांनी मागितले आहे. जन्म व मृत्यू कायदा 1969 मधील सुधारणा अधिनियम 2013 मधील कलम 13 (3) मधील सुधारणेचे अनुषंगाने जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी 13 ऑक्टोबर 2023 रोजी जिल्हातील 14 तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांना प्राधिकृत केलेले आहे. त्यानंतर शासनाने 21 जानेवारी 2025 रोजीच्या पत्राद्वारे उशिरा जन्म व मृत्यू प्रमाणपत्र वितरित करण्याची कार्यवाही शासनाने पुढील आदेशापर्यंत स्थगित केली व 12 मार्च 2025 च्या आदेशाने सुधारित कार्यपद्धती जाहीर केली. दरम्यान जिल्ह्यात 15444 अर्ज उशिराच्या नोंदीसाठी प्राप्त झाले. यामध्ये 9 हजारांवर अर्जावर प्रशासनाद्वारा प्रमाणपत्र देण्यात आल्याची माहिती आहे. नायब तहसीलदार हे कार्यकारी दंडाधिकारी असल्याचा बचाव यापूर्वीच जिल्हा प्रशासनाकडून समोर आलेला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कोणती भूमिका घेतात, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### कारवाई करणार

जिल्हा दंडाधिकारी यांचेकडून तहसीलदार यांना प्राधिकृत करण्यात आले, तरीही अमरावती, अचलपूर नांदगाव, चिखलदरा व चांदूरबाजार तालुक्यात जन्म व मृत्यूच्या नोंदीबाबत नायब तहसीलदारांनी परस्पर आदेश निर्गमित केल्याची बाब अत्यंत गंभीर आहे. याबाबत 24 तासांचे आत समक्ष सादर न केल्यास म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम 1972 नुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे नोटीसमध्ये नमूद आहे.

### अत्यंत गंभीर बाब

तहसीलदार यांना प्राधिकृत केलेले असताना काही तालुक्यात तहसीलदार यांनी अधिकार स्वत: न वापरता परस्पर नायब तहसीलदार यांना अधिकार प्रदान केले. काही तालुक्यात नायब तहसीलदार यांनी जन्म आणि मृत्यूच्या नोंदीबाबत परस्पर आदेश निर्गमित केलेले आहे. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असल्याचे तहसीलदारांना दिलेल्या नोटीसमध्ये नमूद आहे.

# अमरावती विमानतळाला बाळासाहेब ठाकरे यांचे नाव द्या

## युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश कावडकर यांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.24 )** – अमरावती विमानतळाला बाळासाहेब ठाकरे यांचे नाव द्यावे अशी मागणी युवासेना (उबाठा) जिल्हाप्रमुख अंकुश कावडकर यांनी केली आहे. यासंदर्भात कावडकर यांनी अमरावती जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना (दि.22) निवदेन पाठविले. जिल्ह्यातील बेलोरा येथील नविन विमानतळ पूर्णता तयार झाले असून अवघ्या काही दिवसात प्रवाशांकरिता सुरू होणार आहे. या विमानतळावरून नागरिक मोठमोठ्या शहरांमध्ये प्रवास करतील, सोबतच व्यावसायिक कामांचा वेग वाढणार आहे. स्थानिक दुकानदारांना सुद्धा रोजगाराची संधी उपलब्ध आहे. मात्र त्या ठिकाणी अद्यापही विमानतळाचे नामकरण होऊन कोणतेही नाव देण्यात आले नाही. त्यामुळे अमरावती येथील बेलोरा विमानतळाचे नामकरण हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे असे करावे, अशा मागणीचे निवेदन



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश कावडकर यांनी जिल्हाधिकारी यांना दिले. यावेळी युवासेना युवासेना जिल्हा चिटणीस प्रतिक राऊत, युवासेना दर्यापूर तालुकाप्रमुख सागर गिरहे, युवासेना अंजनगाव तालुकाप्रमुख विशू सावरकर, युवासेना अंजनगाव शहर प्रमुख अक्षय गवळी, युवासेना दर्यापूर शहर चिटणीस रुपेश मोरे, गोपाल महानकर उपस्थित होते.

# सोहम डफळेची राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड





**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.24 )** – स्थानिक शिवाजी उच्च माध्यमिक शाळा येथील इयत्ता नववीचा विद्यार्थी चि.सोहम सतिश डफळे याची बिहार राज्यातील गया येथे होणाऱ्या राष्ट्रीय सब ज्युनिअर कबड्डी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

विदर्भ कबड्डी असोसिएशन व चंद्रपूर जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच बल्लारशा येथे राज्यस्तरीय सब ज्युनिअर मुला मुलींच्या कबड्डी स्पर्धा व राष्ट्रीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले.या स्पर्धेमध्ये विदर्भातील अकराही जिल्ह्यातील मुला–मुलींचे एकूण 22 संघ सहभागी झाले होते.त्यामधून राष्ट्रीय सब ज्युनिअर कबड्डी स्पर्धेसाठी 24 मुला मुलींची निवड करण्यात आली.यामध्ये 220 पेक्षा अधिक खेळाडूंची निवड चाचणी घेण्यात आली. त्यामधून निवड समिती तर्फे शिवाजी शाळेचा सोहम डफळे या खेळाडूची पहिल्या बारा खेळाडूंमध्ये निवड करण्यात आली.बिहार राज्यातील गया येथे दिनांक 27 मार्च ते 30 मार्च यादरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये तो विदर्भाचे प्रतिनिधित्व करणार आहे. सोहम याच्या निवडीबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख,उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुलकर,पर्यवेक्षक उद्धव गिद,शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी,शिक्षकेतर प्रतिनिधी विठ्ठल गवई,क्रीडा शिक्षक विजय तारापुरे, अजय हिवसे, क्रीडा मार्गदर्शक अनिल जावळे, प्रतीक उगले यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले व राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा दिल्या. त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. तो आपल्या यशाचे श्रेय शाळेचे शिक्षक व आपल्या आई, वडिलांना देतो.



# ग्रामिण हद्दीतील दोन मुलींचे अपहरण

**अमरावती** – ग्रामिण भागातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दोन अल्पवयीन मुलींना अज्ञाताने फुस लावून पळवून नेले. 23 फेब्रुवारी रोजी शेंदुरजना घाट पोलिस ठाण्यात 17 वर्षीय मुलीला कुणीतरी फुस लावून पळवून नेल्याची तक्रार कुटुंबीयांनी केली आहे. त्याचप्रमाणे परतवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एक मुलगी खेळण्यासाठी घरातून बाहेर गेली. परंतू ती घरी परतली नाही. तिला अज्ञात इसमाने पळवून नेल्याचे तिच्या कुटुंबीयांनी तक्रारीत म्हटले आहे.

# अमरावती वकील संघ निवडणूक, शनिवारी मतदान

## उमेदवारांचे अर्ज दाखल सुरूवात | उमेदवारी अर्ज 25 तारखेपर्यंत मागे घेता येणार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.24 )**– अमरावती जिल्हा वकील संघासाठी येत्या शनिवारी (दि.29) मतदान होत आहे. शुक्रवारी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, ग्रंथालय सचिव व सदस्य पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. 25 तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. याच दिवशी उमेदवारांची अंतिम यादी जाहीर होणार आहे. अमरावती जिल्हा वकील संघाची निवडणूकीसाठी नामांकन अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. अँड. धनंजय तोटे व अॅड. राजु जामनेकर यांचा उमेदवारी अर्ज रद्द करण्यात आला. एकूण 11 पदासाठी सदर निवडणूक होत आहे. अध्यक्ष पदासाठी अॅड. सुनील देशमुख व अॅड. हरीश निंबाळकर आमने सामने आहेत. उपाध्यक्ष पदासाठी अॅड. विनोद दशशस्त्र, अॅड. आशिष लांडे, सचिव पदासाठी अॅड. अमोल मुरळ, अॅड. नासीर शाह, अॅड. सीमा तोंडरे, ग्रंथालय सचिवासाठी अॅड. विद्या मानके, अॅड. सचिन पंडीतकर, अॅड. किरण यावले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. 7 सदस्य पदासाठी अॅड. अक्षय बोळे, अॅड. प्रेम दामोदर, अॅड. विक्रांत देशमुख, अॅड. अफरोज खान, अॅड. नोतल मह्ला, अॅड. गजानन मनोहरे, अॅड. चंद्रमोहन मिसल, अॅड. आशिष परिहार, अॅड. पूनम रिठे, अॅड. सुमित शर्मा, अॅड. विशाखा तागडे, अॅड. ऋषीकेश उपाध्याय यांनी नामांकन अर्ज दाखल केला. मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून अॅड. रामपाल कलंत्री व उप निवडणूक अधिकारी अॅड. शहजाद नैय्यर कामकाज पाहत आहेत.



### 25 तारखेला अंतिम यादी

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर 24 तारखेला हरकतींवर सुनावणी होणार आहे. 25 मार्च रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिवस आहे. दुपारी दोन वाजता उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली जाणार आहे. 29 मार्च रोजी सकाळी 10 ते दुपारी 4 या वेळेत मतदान होणार आहे. सायंकाळी 5.30 वाजतापासून मतमोजणीला सुरु होणार आहे.



# ट्रॅक्टरखाली दबून चालकाचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.24 )** – तालुक्यातील शहापूर माऊली येथे पलटी झालेल्या ट्रॅक्टरखाली दबून चालकाचा मृत्यू झाला. ही घटना रविवारी (दि.23) घडली. नामदेवराव पंजाबराव मालवे (वय 55 वर्ष) असे मृत्यूमुखी पडलेल्या ट्रॅक्टर चालकाचे नाव आहे. मालवे हे सकाळी ट्रॅक्टर घेऊन दीपक वाडेकर यांच्या शेतामध्ये नांगरणी करत होते. शेत उतार भागावर असल्याने नागरतांना ट्रॅक्टर पलटी होऊन त्यामध्ये मालवे हे ट्रॅक्टर खाली दबले ज्यामध्ये त्यांच्या घटनास्थळी मृत्यू झाला. त्यांच्यावर पोस्टमार्टम करून त्यांच्या अंत्यविधी करण्यात आला. पुढील तपास दर्यापूर पोलीस स्टेशन करीत आहे.



# रेतीची अवैध वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.24 )**– रेतीची अवैधरित्या वाहतुक करणार्या एका ट्रॅक्टरला शिरजगाव कसबा पोलिसांनी 23 फेब्रुवारी रोजी शितला माता मंदिराजवळ पकडले.

याप्रकरणात पोलिस हवालदार सुनिल खेरडे यांच्या तक्रारीवरून शिरजगाव कसबा पोलिस ठाण्यात आरोपी सुरज गंगाराम कुसराम (28, रा. गवारीपुरा, शिरजगाव कसबा) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून ट्रॅक्टर,



ट्रॉली व रेती असा एकुण 4 लाख 55 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील कारवाई महसूल विभागामार्फत सुरु आहे.

# दर्यापूर महसूल प्रशासनाची वाळू माफियांवर धडक कारवाई

## वाळूची व मातीची अवैध तस्करी करणारा ट्रॅक्टर व ट्रक जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.24 )** – अवैध वाळू उपसा आणि माती बिनापरवाना वाहतूक करणारा ट्रक व ट्रॅक्टर महसुल विभागाने 22 मार्च रोजी जप्त केला आहे. या कारवाईमुळे वाळु माफीयांचे धाबे दणाणले आहे.

दर्यापूर तालुक्यातील नदी पात्रातून खूप मोठ्या प्रमाणात रेतीची व वीट भट्टीकरिता लागणारी माती अवैध वाहतूक मोठ्या प्रमाणात केली जात आहे. त्यातच महसूल प्रशासन सुद्धा मार्च एंडिंग असल्यामुळे अॅक्शिन मोडवर आहे. महसूल पथकाने आता या वाळू तस्करांविरुद्ध कार्यवाही सुरु केली आहे. नायब तहसीलदार प्रमोद काळे यांच्या नेतृत्वातील महसूल पथकाकडून कारवाईचा सपाटा सुरू केला आहे आहे. यापूर्वी महसुल विभागामार्फत अनेक ट्रॅक्टर, ट्रक जप्त करून गुन्हा दाखल केलेला आहे. तरीही हे मुजोर वाळू माफिया रेती तस्करी करीतच आहे. 22 मार्च रोजी एका ट्रॅक्टरवर दुपारच्या सुमारास भरदिवसा कारवाई करण्यात आली. दर्यापूर तालुक्यातील हसनपुर, शहापूर माऊली च्या परिसरातून अवैध रेती वाहतूक करताना ट्रॅक्टर ताब्यात घेतला असून वाहन चालकाने वाहन सोडून पोबारा केला आहे. ही कारवाई नायब तहसीलदार प्रमोद काळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमोद भगत सहाय्यक महसूल अधिकारी तलाठी गोंडाणे यांनी शनिवारी दुपारी दोनच्या सुमारास केली आहे.



### गौण खनिज तस्करांच्या मुसक्या आवळल्या

हसनपुर परिसरामधील शहापूर येथे रात्रीच्या अंधाराचा फायदा हे रेतीतस्कर मोठ्या प्रमाणावर घेत आहेत. शनिवारी दुपारच्या सुमारास एका विनानंबर ट्रॅक्टरसह ट्रॉली संशयास्पद अवैध वाहतूक करताना आढळून आली. मात्र ट्रॅक्टर मालक रोहन फेरण हा पसार झाला. त्यामुळे महसूल पथकाने सिनेस्टाईल सुमारे एक ते दीड किलोमीटर पाठलाग करून त्याचा ट्रॅक्टर पकडला. दरम्यान, महसूल पथकाला पाहून वाहनचालक हा ट्रॅक्टर सोडून पसार झाला. कारवाई दरम्यान पथकाची चांगलीच दमछाक झाली. त्यानंतर ट्रॅक्टर ताब्यात घेऊन दंडात्मक कारवाईसाठी दर्यापूर तहसील कार्यालयाला आणण्यात आला. दर्यापूर महसूल विभागाच्या सततच्या कारवायांमुळे रेती तस्करांमध्ये चांगलीच दहशत पसरल्याचे चित्र आहे.

### नायब तहसिलदारांच्या पथकाची कारवाई

वीटभट्टीकरिता लागणारी मातीची वाहतूक करणारा ट्रॅक क्र. एमएच 31 सीबी 4569 हा उमेश नाकट (रा. जहाणपूर, ता. दर्यापूर) यांचा हा असून या ट्रॅकवर सुद्धा महसूल अधिकारी नायब तहसीलदार प्रमोद काळे यांच्या पथकाने कार्यवाही केलेली आहे. सदर ट्रॅक हा विना परवानगी माती वाहतूक करत होता. उपविभागीय कार्यालय दर्यापूर येथे सदर ट्रॅक जप्त करून आणण्यात आला आहे. पुढील कार्यवाही दर्यापूर तहसीलदार करत आहेत.

# रमजान ईद : कायदा, सुव्यवस्थेच्या अनुषंगाने बैठक



## पोलिस आयुक्तांकडून मार्गदर्शन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.24 )**– रमजान ईदनिमीत्त शहरात कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने 24 मार्च रोजी पोलिस आयुक्तालयात बैठकीचे आयोजन होते. या बैठकीत पोलिस आयुक्तांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

रमजान ईद शांततेत पार पडावी, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये, याकरीता सकाळी 11.30 वाजता पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी पोलिस उपायुक्त, महानगरपालिका आयुक्त, मुस्लीम समाजाचे मौलवी, प्रतिष्ठित नागरिक, शांतता समिती सदस्य, सर्व सहा पोलिस आयुक्त, विद्युत विभागाचे प्रशासकीय प्रमुख, इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. बैठकीमध्ये उपस्थित सदस्यांनी रमजान मास व रमजान ईद आनंदात साजरी होण्यासाठी काही मुद्दे उपस्थित केले. त्यावर पोलीस आयुक्त यांनी अमरावती शहर अंत्यत शांतताप्रिय असून येथील हिंदू व मुस्लिम नागरीकांनी शहरातील शांतता अबाधीत ठेवण्याकरिता नेहमीच सहकार्य केले आहे. त्यामुळे यापुढेही अमरावती शहर वासियांकडून अशाच सहकार्याची अपेक्षा आहे. त्यांनी आपसामध्ये भाईचारा ठेवून शहरात कोणताही अनुचित प्रकार होणार नाही, यादृष्टीकोनातून एकजुट राहुन शहरात शांतता कायम ठेवावी, याकरिता ही बैठक घेण्यात आली.

### तरुणांना समुपदेशन करा

कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करणार्याविरुध्द सुध्दा कठोर कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे. काही तरुण मंडळी अफवेमुळे, सोशल मिडीयावर प्रकाशित होणारे पोस्ट मुळे व त्यांना खोटे प्रोत्साहन मिळत असल्याने त्यांच्याकडून अनुचित प्रकार घडुन येतो, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल होतात. त्यामुळे सर्वांनी आपल्याकडील तरुण मंडळींचे समुपदेशन करून त्यांना योग्य सुचना द्याव्यात. असे बैठखीत सुचित करण्यात आले.

### पोलिसांना सहकार्य करावे

अमरावती शहर यांनी रमजान मास व रमजान ईदउत्सवादरम्यान शहरातील शांतता अबाधित राहील, याबाबत नागरिकांनी तथा बैठकीतील सर्व सदस्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी केली आहे. तसेच रमजान मास व रमजान ईदनिमित्त हार्दीक शुभेच्छा दिल्यात.

### समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांवर होणार कारवाई

बैठकीमध्ये रमजान ईद दरम्यान शहरातील साफसफाई करण्यात यावी याबाबत महानगर पालिकाअधिकारी यांना निर्देश देण्यात आले. तसेच सण–उत्सव काळत शहरातील पाणीपुरवठा, विजपुरवठा खंडीत होणार नाही, याबाबत विज वितरण व पाणीपुरवठा विभागास सुध्दा सुचित करण्यात आले आहे. त्यांनी सर्व उपस्थितांना कोणत्याही अफवेवर विश्वास ठेवू नये, सोशल मिडीयावर प्रकाशित होणारे माहितीबाबत खात्री करावी त्याची माहिती पोलिसांना द्यावी, समाजाततेढ निर्माण करणारे पोस्ट व्हायरल करणा–याची माहिती घेवून पोलीसांना कळवावे. सोशलमिडीयावर प्रकाशित होणारे पोस्ट करणारे व्यक्तीवर सायबर पोलीसतर्फे करडी नजर राहील. सोशल मिडीयाव्दारे पसरणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवु नये. पोलीस विभागाकडून शहरातील शांतता भंग करणारे समाजकंटकांची माहिती संकलीत करण्यात आलेली असून त्यांच्यावर कठोर करवाई करण्यात येणार आहे.

# टरबूजावर अज्ञात रोगाचा प्रादुर्भाव

## शेतकऱ्यांचं आर्थिक नुकसान
## उत्पादकांच्या डोळ्यात अश्रू



**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट, ( दि.24 )–** अचलपुर, अंजनगाव तालुक्यातील टरबूज शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. यंदा टरबूज आणि खरबूज पिकावर अज्ञात रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. यंदा टरबूज आणि खरबूज पिकावर अज्ञात रोगाचा प्रादुर्भाव झालाय. या रोगाच्या प्रादुर्भावामुळे अक्षरशः शेतकऱ्यांचं टरबूज पिक हातातून निघून गेलंय. काही शेतात टरबूज चक्क पपई सारखे दिसू लागले. हे टरबूज पिक पिवळं पडल्याने शेतकऱ्याचं अतोनात नुकसान झालं आहे. हेक्टरीनुसार 1 लाख रुपये खर्च टरबूज लागवडीसाठी केलाय. परंतु आता खर्च निघणही शेतकऱ्यांसमोर कठीण झालंये. त्यामुळ सरकारनं तातडीने नुकसानाचे पंचनामे करून टरबूज पिकाला विमा कवच द्यावे, अशी मागणी शेतकरी करतात. अक्षरशः संतापलेल्या शेतकऱ्यांनी शेतातलं टरबूज पीक उखळून फेकले. बऱ्याच शेतकऱ्यांनी टरबूज पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड केली आहे. या टरबुजाच्या लागवडीतूनही शेतकऱ्यांना मोठा नफा मिळतो. पण, यंदा टरबूज पिकावर अज्ञात रोग आला अन चक्क हिरवे दिसणारे टरबूज काही दिवसातच पूर्णतः पिवळे पडले. यासाठी शेतकऱ्यांनी किडनाशकांच्या फवारण्या, तसेच खत नियोजन केले खरी, परंतु त्याचा काहीही फायदा होतांना दिसत नाहीये. कृषी विभागाला तक्रारी केल्या मात्र अद्यापही कोणीही डोकावून सुद्धा पाहलं नाही. अखेर वैतागून शेतकऱ्यांनी हतबल होत शेतातलं टरबूज जनावरांसमोर खायला टाकलंये. तर काही शेतकऱ्यांनी टरबूज पिक जमिनीतून उपटून रस्त्यावर फेकले.

### अज्ञात रोगामुळे टरबूज पिकावरील लक्षणे पुढीलप्रमाणे

- अज्ञात रोगामुळे टरबुजाची वाढ थांबली.
- अनेक ठिकाणी टरबुजाच्या वेली अक्षरशः जळल्या.
- काही शेतकऱ्यांच्या शेतात टरबुजाच्या वेली वाढवण्याअगोदरच पूर्णतः जळाल्या.
- महत्वाचं, हिरवी दिसणारे टरबूज लवकरच पिवळे पडते.
- टरबूज फळातील गोडवा गायब

### एकरी लाख रुपये खर्च

अंजनगाव, अचलपुर तालुका हा बागायतदार असून इथे शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात टरबूज आणि खरबुजाची लागवड केली. मात्र, वातावरण बदलाचा या पिकांवर मोठा फटका बसलाय. रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने टरबूज आणि खरबूज पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. काही शेतकरी सांगतात की त्यांनी टरबूज पिकाची लागवड केली होती. हेक्टरी नुसार एक लाख रुपये इतका खर्च लागवडीसाठी लागला. अनेक औषधी फवारणीसह उपाययोजना केल्या, मात्र एकही रुपयाचे उत्पन्न हातात आलं नाहीये.

# शासकिय वसतीगृहांच्या सुधारणेसाठी धोरण ठरवावे

## ■ आ. संजय खोडकेंची विधानपरिषदेत लक्षवेधी
## ■ भोजन, स्वच्छतेबाबतचा मुद्दा मांडला



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.24 ) –** महाराष्ट्र विधान परिषदेवर निर्वाचित होताच आ. संजय खोडके हे विधीमंडळाच्या कामकाजात सक्रिय झाले असून लक्षवेधीच्या माध्यमातून त्यांनी आपल्या प्रदीर्घ अनुभवाचा परिचय सभागृहाला करून दिला आहे. आज सोमवारी कामकाजात विधान परिषदेमध्ये शासकीय वसतीगृहातील सुविधा व सुधारणासंदर्भातील प्रश्नोत्तरा दरम्यान आमदार संजय खोडके यांनी शासकीय वसतीगृहातील भोजन, स्वच्छता व आदी सर्व सुविधांसोबतच कर्मचार्यांयबाबत उपयुक्त धोरण तयार करण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच वसतीगृहात एका अधीक्षकाच्या अधिनस्त बाह्य स्वतंत्र कंत्राटाच्या माध्यमातून सेवा पुरविण्यासाठी शासनाने विचार करावा, अशी मागणी सुद्धा त्यांनी केली.

राज्यातील शासकीय वसतीगृहात कर्मचार्यांची संख्या कमी असल्याने वसतीगृहातील कामकाज हे कंत्राटी पद्धतीने करण्यात येते. देखभाल व दुरुस्ती, भोजन कंत्राट, स्वच्छता, सुरक्षा व्यवस्था अशी विविध कामे सुद्धा बाहेरील वेगवेगळ्या कंत्राटी संस्थाच्या माध्यमातून केली जातात. त्यामुळे कामकाजात कुठेतरी अनियमितता व अडचणी निर्माण होत असल्याच्या अनेक तक्रारी आहेत. सद्या समाजकल्याण विभागात कर्मचारी भरती होत नसल्याने शासकीय वसतीगृहातील कामकाजा संदर्भात तक्रारी येणारच आहे. त्यामुळे शासकीय वसतीगृहातील सुधारणासंदर्भात एक उपयुक्त धोरण ठरविण्याची गरज असल्याची बाब आमदार असे संजय खोडके यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. शासकीय वसतीगृहातील कर्मचारी, भोजन व्यवस्था, स्वच्छता, यासह विद्यार्थी हिताच्या कुठल्याही उपाययोजना यासाठी वेगवेगळे कंत्राट न देता सर्व सेवा ही एकाच बाह्य स्वतंत्र कंत्राटामार्फत पुरविण्याची लक्षवेधी सुद्धा आ. संजय खोडके यांनी केली. यासाठी शासनाकडून एक अधीक्षक नेमून त्यांचे अधिनस्थ इतर सर्व कामे कंत्राटी पद्धतीने करणे महत्वाचे असल्याने शासनाने या दृष्टीने विचार करून निश्चित धोरण ठरविण्याची मागणी संजय खोडके यांनी केली.

यावर उत्तर देतांना राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री संजय सिरसाट यांनी सांगितले की, सद्या शासकीय वसतीगृहांमध्ये 40 टक्के कर्मचारी कमी असल्याने नाईलाजास्तव बाह्य कंत्राटी यंत्रणेच्या माध्यमातून सेवा पुरविली जात आहे. यापुढे सुद्धा वसतीगृहात कुठलीही कमतरता भासणार नाही याची पूर्ण काळजी घेतली जाणार असल्याचे उत्तर मंत्री महोदयांच्या वतीने देण्यात आले.

# सावंगा विठोबा येथे 29 पासून गुढीपाडवा-रामनवमी महोत्सव

## विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन ■ गुढीपाडव्याला झेंडे चढविण्याचा सोहळा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.24 ) –** जिल्ह्यात चांदुर रेल्वे तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे शनिवार 29 मार्चपासून गुढीपाडवा-रामनवमी यात्रा महोत्सवाला सुरुवात होत आहे. त्यानिमित्त 7 एप्रिलपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुढीपाडव्याला येथे झेंडे चढविण्याची प्रथा असून हा सोहळा भाविक भक्तांसाठी आकर्षण असतो.

29 मार्चला सकाळी 7 ते 10 वाजता मंदिर परिसर आणि गावात साफसफाई करण्यात येणार आहे. सायंकाळी 5 वाजता अमावस्यानिमित्त चंदनउटी आणि रमणा हा कार्यक्रम पार पडेल. रविवार, 30 मार्चला सायंकाळी 5 वाजता गुढीपाडवानिमित्त महाराजांचे झेंडे चढविण्याचा नेत्रदीपक सोहळा संस्थानचे विश्वस्त चरणदास कांडलकर यांच्या शुभहस्ते आणि विश्वस्त मंडळाचे उपस्थितत संपन्न होणार आहे. सोमवार, 31 मार्च ते 5 एप्रिल या कालावधीत विविध धार्मिक



कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दैनंदिन कार्यक्रमांत दिवसरात्र अवधूत भजन, रात्री रमणा पालखी रथ आणि महाराजांचे ओवीवर प्रवचन होईल. तसेच रक्तदान शिबीर पार पडणार आहे. रविवार, 6 एप्रिलला दुपारी 4 वाजात रामनवमी निमित्त चंदनउटी आणि रमणा, रात्री 8 वाजता प्रवचन, सोमवार, 7 एप्रिलला सकाळी 6.30 वाजता चैत्र मास मांडीच्या वाढव्यास अर्जांनी प्रारंभ, सकाळी 7 ते 9 दरम्यान मुख्य मंदिरातून लहान मंदिर, संपूर्ण गावातून भजन, रमणा, पालखी, रथ सह शोभायात्रा तसेच ढालीचा आणि मांड वाढव्याचा कार्यक्रम आणि सकाळी 9 ते 10 वाजता सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. दुपारी 1 वाजता भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. संस्थानचे वतीने भाविकांकरिता सावलीसाठी दर्शन नेट मंडप, चप्पल स्टॅण्ड, झेंडे चढतांना बोहली समोरुन सतत दर्शन, यात्रेत टँकर द्वारे पाणी पुरवठा व्यवस्था, भाविकांकडून दान साहित्य जमा करण्यासाठी संस्थानचे गावात येणार्यान सर्व मार्गावर मंडप व्यवस्था, भाविक भक्त आणि मांडींना बसण्याकरिता भव्य मंडप व्यवस्था, स्वयंसेवक निवास व्यवस्था तसेच भक्त निवास हॉलमध्ये भाविकांकरिता मसाले-भात प्रसाद व्यवस्था करण्यात येत आहे. भाविक- भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, अशी विनंती संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, सर्व विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, अनिल बेलसरे, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी आदींनी केले आहे.

# अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल परिसरातून दुचाकी लंपास

**अमरावती –** फ्रेजरपुरा ठाण्याच्या हद्दीतील मार्डी मार्गावरील अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल परिसरातून दुचाकी लंपास करण्यात आली. ही घटना 23 मार्च रोजी उघडकीस आली. तपोवन परिसरातील रहिवासी अंबादास वाटाणे (62) हे अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलमध्ये गेले होते. यावेळी त्यांनी आपली दुचाकी क्रमांक एमएच 27 सीजी 3189 ही तेथील पार्किंगमध्ये उभी केली होती. सदर दुचाकी अज्ञात चोरट्याने लांबविली. ही बाब लक्षात आल्यावर अंबादास वाटाणे यांनी फ्रेजरपुरा ठाण्यात तक्रार दाखल केली. पुढिल तपास करीत आहे.

# पैशांसाठी जीवे मारण्याची धमकी

**अमरावती –** उधारीचे दोन लाख रुपये परत दिल्यानंतरही तगादा लावून एका इसमाला जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. या घटनेची तक्रार शेख इरफान शेख कादर (40, रा. शेख सोहेल शेख इस्माईल, शेख जाबु शेख साबीर व शेख शब्बीर शेख साबीर (सर्व रा. अब्दुला पार्क, अमरावती) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.



# तेरवी, दसव्याच्या खर्चातून दिव्यांगाना जिवनावश्यक वस्तूंचे वाटप

## ■ प्रथा, परंपरेला दिला फाटा
## ■ हागोणे परिवाराने ठेवला आदर्श

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगांव सुर्जी, ( दि.24 ) –** अंजनगाव सुर्जी येथील निवृत्त गटशिक्षनाधिकारी प्रभुदास हागोने यांचा तरुण मुलगा आकाश याचे 13 मार्चला अकाली निधन झाले. त्यामुळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असताना हागोने परिवाराने या कठिण प्रसंगातही सामाजिक दातृत्वाचा परिचय देत समाजापुढे आदर्श निर्माण केला. निधनानंतर तेरवी, दसव्यासारख्या प्रथेला फाटा देत हागोने कुटुंबाने त्या रकमेतून तालुक्यातील अंध-अपंगांना जिवनावश्यक वस्तु व रोख स्वरुपात मदत केली. हागोने परिवाराच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. अंजनगाव सुर्जी तालुक्यातील विहीगाव येथील रहीवाशी प्रभुदास हागोने यांचे कुटूंब पुर्विपासूनच पुरोगामी विचाराची कास धरणारे कुटूंब म्हणुन ओळखले जाते. पंचायत समीती येथे गटशिक्षणाधीकारी म्हणुन प्रभुदास हागोने हे निवृत्त झाले आहेत. अशातच त्यांचा एकुलत्या मुलाचे ऐन होळीच्या दिवशी अकस्मित निधन झाले. या दुःखाच्या समयी मृत्यूनंतरचे सोपास्कार पार पाडण्याची जवाबदारी वडीलांवर आली. तरुण मुलाच्या जाण्याचे दुःख मनावर दगड ठेवून प्रभुदास हागोने यांनी थोडेफार बाजूला सारले आणि या कठिण प्रसंगातही सामाजिक बांधीलकीच्या जाणीवेतून आपल्या सुधारणावादी विचारांचा परिचय दिला. त्यांनी तेरवी न करता जेवनावळीवर खर्च होणारी रक्कम गोरगरीब, अंध, अपंग कुटुंबांना जिवनावश्य वस्तु व आर्थिक मदत प्रदान केली. यात हागोने कुटुंबासह बहीन अनुषा व जावाई उमंग लहाने, नातेवाई, मित्रमंडळींची साथ मिळाली. स्व. आकाश याचे स्मुतीप्रीत्यर्थ याच दिवशी तीस कुटुंबांना दरवर्षी अशीच मदत करण्याचा संकल्प हागोने कुटुंबाने केला. याबद्दल हागाने कुटुंबियांचे सर्वत्र कौतूक होत आहे.

# मराठा विवाह मंडळ हे समाजाचे भूषण - आ.संजय खोडके

## उपवर युवक - युवती व पालक परिचय मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती( दि.24 ) –** आजच्या काळात विवाह जुळविणे ही फार मोठी समस्या असून गेल्या 34 वर्षापासून मराठा विवाह मंडळ हे कार्यकेवळ समाजसेवा म्हणून सातत्याने करीत असून हे मंडळ समाजाचे भूषण आहे. समाजातील ज्येष्ठ मंडळी निस्वार्थपणे हे कार्यकरीत असल्याने सर्वसमजाने त्यांच्या पाठीशी तन-मन-धनाने उभे राहावे, असे आवाहन आमदार संजय खोडके यांनी केले.

मराठा विवाह मंडळ व वाचनालयाच्यावती ने रूक्मिणी नगर येथील सुयोग मंगल कार्यालयात आयोजित' उपवर युवक-युवती व पालक 'परिचय मेळाव्यात ते बोलत होते. मंडळाचे अध्यक्ष माजी कुलगुरू डॉ. गणेश पाटील यांच्या अध्यक्षतेत आयोजित या मेळाव्याचे उदघाटन आमदार सुलभा खोडके यांच्या हस्ते झाले. जिजाऊ कमर्शियलको-ऑप बँकेचे अध्यक्ष अविनाश कोठाळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आमदार सुलभा खोडके यांनी आपल्या उदघाटनपर भाषणातून मराठा विवाह मंडळाला सर्व ते सहकार्य करण्यासोबतच उपस्थित उपवर युवक- युवती व पालकांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.प्रमुख पाहुणे अविनाश कोठाळे यांनी आपले मंडळाला सदैव सहकार्य असते असे सांगून बँकेच्या विविध योजनांची माहिती देण्यासोबतच आजच्या तरुणतरुणींनी नोकरीच्या मागे न लागता उद्योजक व्हावे,असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.गणेश पाटील यांनी सहकार्याचे आवाहन करत उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. संजय खोडके यांची महाराष्ट्र विधानसभेवर अविरोध निवड झाल्याबद्धल त्यांचा मंडळाच्यावती ने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. मंडळाचे सरकार्यवाह दिगंबर शहापुरे यांनी वयाची 75 वर्षे पूर्ण केल्याबद्धल मंडळाचे



वतीने त्यांना मानपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. मंडळाचे ज्येष्ठ उपाध्यक्ष आर.देशमुख यांनी आपल्या स्वागतपर व प्रास्ताविकातून मंडळाच्या कार्याची माहिती देऊन उपस्थितांचे स्वागत केले व सर्वांना सहकार्याचे आवाहन केले. मंडळाने प्रकाशित केलेल्या परिचय पुस्तिकेचे पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. मंडळाचे उपाध्यक्ष एकनाथराव भडांगे, प्रा.दिनकर राऊत, नयना गावंडे, कोषाध्यक्ष अशोकराव धाबे, सरकार्यवाह दिगंबर शहापुरे, यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. मंडळाच्या महिलाशाखेतर्फे या सोहळ्यात आ. सुलभा खोडके यांचे स्वागत करण्यात आले. उदघाटन कार्यक्रमाचे संचालन मंडळाचे सहकार्यवाह डॉ.कुमार बोबडे यांनी मेळाव्याचे संचालन तर प्रा.सुनील बुरघाटे यांनी केले. संजय कोहळे यांनी सर्वांचे आभार मानले. मेळाव्याच्या यशस्वितेसाठी उपाध्यक्ष डॉ.बी.आर.देशमुख, एकनाथराव भडांगे, प्रा.दिनकर राऊत, कोषाध्यक्ष अशोकराव धाबे, सरकार्यवाह दिगंबर शहापुरे, सहकार्यवाह अर्चना सवाई, कार्यकारिणी सदस्य सुरेशराव गौरखेडे, ॲड.विजयराव कोठाळे, सुभाषराव अर्डक, शालिनी शहापुरे, जयश्री डहाके, स्मितागोळे, प्रदीप हिवसे, सरला सोलीव, अनुराग शहापुरे, चेतन घटाळे आदींनी परिश्रम घेतले.

# 27 मार्चला स्थानिक पोलिस प्रशासनाची तेरवी

## अवैध धंदे बंद करण्यासाठी केले होते प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन | तेरवीची पत्रीका समाज माध्यमावर प्रसारित

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, ( दि.24 )–** स्थानिक पोलिस प्रशासन त्यांच्या अधिकारात क्षेत्रात सुरू असलेल्या, अवैध धंद्यांवर अंकुश ठेवण्यास असमर्थ ठरले. याचा निषेध म्हणून 27 फेब्रुवारीला पोलिस प्रशासनाच्या, प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले होते. त्यावेळी एका महिन्यात अवैध धंदे बंद करा; अन्यथा पोलिस प्रशासनाची तेरवी करू.असा इशाराही लेखी निवेदनातून देण्यात आला होता. मात्र स्थानिक पोलिस प्रशासन अवैध धंद्यांवर अंकुश ठेवण्यास असमर्थ ठरले.त्यामुळे आंदोलनकर्त्यांनी 27 मार्चला, स्थानिक पोलिस प्रशासनाची तेरवी करण्याचा निर्णय घेतला आहे.

यासाठी तेरवीच्या नियंत्रणाच्या रितसर पत्रिका छापून,समाज माध्यमांद्वारे तेरवीचे निमंत्रण ही देण्यात आले आहे. स्थानिक तालुका भाजप ओबीसी

- शोकसंदेश -

श्री./श्रीमती ________________

**अवैध धंदे बंद करा...**
**आपणास कळविण्यात अत्यंत दुःख होत आहे की, चांदूर बाजार स्थानिक पोलीस प्रशासनाला अवैध धंदे बंद करण्या करिता निवेदन देऊन त्या निवेदनाची दखल न घेतल्यामुळे स्थानिक पोलीस प्रशासनाच्या प्रतिकात्मक पुतळ्याचा अंत्यविधी गुरूवार दि. २७/२/२०२५ चांदूर बाजार पोलीस स्टेशन येथे करण्यात आले सदर आंदोलनाची कोणतीही दखल न घेतल्या मुळे पोलीस प्रशासनाच्या प्रतिकात्म पुतळ्याच्या तेरवीचा कार्यक्रम– गुरूवार दि. २७-०३-२०२५ ला करण्यात येत आहे तरी सदर कार्यक्रमाला उपस्थित राहावे हि नम्र विनंती.**

| – स्थळ – | - शोकाकुल - |
|---|---|
| पोलीस स्टेशन चांदूर बाजार | रावसाहेब घुलक्षे (तालुकाध्यक्ष भाजपा ओबीसी मोर्चा) |

सेलच्या अध्यक्षांनी स्थानिक पोलिस प्रशासनाला अवैध धंद्यांबाबत वारंवार सुचित केले. स्थानिक पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या परिसरात, अवैध धंदे जोरात सुरू आहेत. ते सर्व अवैध धंदे त्वरीत बंद करण्यात यावे. याबाबत निवेदन व प्रत्यक्ष भेटून सुचनाही दिल्या. याचा स्थानिक पोलिसांवर कोणताही परिणाम झाला नाही. अवैध धंदे जोरात सुरू होते. तेव्हा पोलिस प्रशासनाचा निषेध म्हणून भाजप ओबीसी सेलच्या अध्यक्षांनी, पोलिस स्टेशनच्या दारातच पोलिसांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले होते. त्यावेळी एका महिन्यात अवैध धंदे बंद न केल्यास, पोलिस प्रशासनाची तेरवीही करण्यात येईल.असा इशारा ही पोलिस प्रशासनाला देण्यात आला होता.

राज्यात भाजपची सत्ता, गृहमंत्री पदही भाजपकडे. तरीही भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या इशार्याचा पोलिस प्रशासनावर कोणताही परिणाम झाला नाही. परिणामी स्थानिक पोलिस प्रशासनाचा निष्क्रिय कारभार. तसेच अवैध धंद्यांबाबत असलेले प्रेम चव्हाट्यावर आले. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या भाजप ओबीसी सेलच्या तालुका अध्यक्षांनी, पोलिस प्रशासनाची तेरवी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पोलिस प्रशासनाच्या तेरवीची रितसर पत्रिका छापून,ती समाज माध्यमाव्दारे निमंत्रण पत्रिका म्हणून लोकांपर्यंत पोहोचती केली. एवढेच नव्हे तर पोलिस प्रशासनाचा सुतक्या म्हणून, भाजप ओबीसी सेलच्या अध्यक्षांनी शोकाकुल म्हणून स्वतःचे नावही टाकले आहे. भाजप ओबीसी सेलचे अध्यक्ष पोलिस प्रशासनाची तेरवी करणार, की पोलिस प्रशासन त्याआधीच त्यांचेवर कारवाई करणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.



शहरातच नव्हे तर तालुक्यातही सर्वच अवैध धंदे जोरावर आहेत. स्थानिक पोलिस स्टेशन पासून ते ग्रामीण पोलिस अधीक्षकांपर्यत सर्वांना निवेदने दिलीत. प्रतिकात्कम पुतळा ही जाळला. तरीही वाळू तस्करी, वरली मटका, भाईगिरी, गोवंश वाहतूक व मांस विक्री, अवैध दारू यासारखी सर्वच अवैध धंदे बिनबोभाट सुरू आहेत. पोलिस प्रशासनाला या पोटी चांगलीच हस्याची मलाई मिळत आहे. त्यामुळे पोलिस अवैध धंद्यांवर कोणतीच कारवाई करीत नाहीत. त्यामुळे अशा आंदोलनाचा मार्ग निवडावा लागला आहे.

**–रावसाहेब घुलक्षे, तालुका अध्यक्ष**
**भाजप ओबीसी सेल तथा पोलिस प्रशासनाची तेरवीकर्ते**

# मेळघाट रंगोत्सवात उमेदचे स्टॉल ठरले आकर्षणाचे केंद्र

## स्वयं सहाय्यता गटाच्या उत्पादनांना पसंती




**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.24 ) –** चिखलदरा येथे 23 मार्च रोजी मेळघाट रंगोत्सव 2025 या विशेष महोत्सवाच्या निमित्ताने उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान चिखलदरा अंतर्गत स्वयंसहाय्यता गटातील महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांचे भव्य प्रदर्शन व विक्री करण्यात आली. हे स्टॉल महोत्सवात आलेल्या आदिवासींसाठी आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले. स्वयंसहाय्यता गटाच्या उत्पादनांना उपस्थितांनी चांगली पसंती दिली.

या उपक्रमाद्वारे ग्रामीण महिलांनी तयार केलेली सेंद्रिय अन्नपदार्थ, पर्यावरणपूरक वस्तू आणि स्थानिक वैशिष्ट्यपूर्ण उत्पादने ग्राहकांसमोर सादर केली गेली. यामुळे महिला उद्योजकांना आर्थिक स्वावलंबनाची संधी मिळाली. तसेच स्थानिक उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळण्यास मदत झाली. मेळघाटचे आमदार केवळराम काळे यांनी स्वयंसहायता समूहाच्या स्टॉलवरून मोहाचे लाडू खरेदी करून उपस्थित कार्यकर्त्यांना चाखण्यास दिले. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करून महिला आणि उमेदच्या टीम ला शुभेच्छा दिल्या. मेळघाट रंगोत्सवाला भेट दिलेल्या नागरिकांना आणि पाहुण्यांना या उत्पादनांचे दर्शन घेण्याची आणि चव घेण्याची संधी मिळाली तसेच त्यांनी बनवलेल्या दर्जेदार वस्तू खरेदी करून महिला उद्योजकांना प्रोत्साहन दिले. उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान चिखलदरा च्या वतीने ग्रामीण महिलांना आर्थिक स्वावलंबन, कौशल्य विकास आणि उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. मेळघाट रंगोत्सव 2025 या उपक्रमाद्वारे महिलांना त्यांच्या उत्पादनांसाठी विस्तृत बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी उमेद महाराष्ट्र, चिखलदरा ब्लॉक मिशन मॅनेजर अजिंक्य येवले, क्लस्टर कोर्डिनेटर चेतन गायगोले यांनी उपस्थित राहून महिलांना मार्गदर्शन केले व त्यांच्या उत्पादकतेला चालना देण्यासाठी सहकार्य केले.

# दक्षिण केरळमधील पोन्मुडि



**स्थान:** दक्षिण केरळमधील, थिरुवनंतपुरम शहरापासून साधारणतः ६१ किलोमीटर.

**उंची:** समुद्रसपाटीपासून ९१५ मीटर ऊंच.

थिरुवनंतपुरमपासून काही किमी ड्राईव्हच्या अंतरावरच पोन्मुडि हे मनोरम असे हिल रिसॉर्ट आहे जेथे तुम्ही निमुळते चक्राकार रस्ते,शीतल आणि हिरव्यागार अशा वातावरणाचा आनंद लुटू शकता. विविध प्रकारांनी सजलेली पहाडी फुले, रंगीबेरंगी फुलपाखरे, छोट्या छोट्या नद्या यांनी सजलेले पोन्मुडि आपल्याला ट्रेकिंगसाठी देखील एक उत्तम स्थान बहाल करते. चहाचे मळे आणि धुक्यांनी भरलेल्या घाटींमुळे पोन्मुडि हे कॉटेज आणि डॉर्मिटरी अकोमडेशन (धर्मशाळा निवास) या सुविधांनी युक्त असे आणि जोमाने विकसित होणारे हिल रिसॉर्ट आहे.

**येथे पोहोचण्यासाठी: जवळचे रेल्वे स्थानक:** थिरुवनंतपुरम सेंन्ट्रल, साधारण ६१ किमी **जवळचा विमानतळ:** थिरुवनंतपुरम आंतरराष्ट्रीय विमानतळ, साधारण ६७ किमी.

# कोकणातील श्री क्षेत्र कुणकेश्वर



कोकणात श्रद्धास्थानाची कमी नाही. गणपतीपुळे, पावस, पाली यासारख्या देवळांबरोबरच देवगड जवळील दक्षिणकाशी समजले जाणारे श्रीक्षेत्र कुणकेश्वर हे देखील प्रसिद्ध मंदीर आहे .

देवगडच्या दक्षिणेस २० कि.मी. वर असलेले श्री क्षेत्र कुणकेश्वर निसर्गरम्य सौंदर्यस्थळ आणि दक्षिण काशी म्हणून समजले जाते. श्री कुणकेश्वर मंदिराचे वैशिष्ट्यपूर्ण बांधकाम आणि किनाऱ्यावरील या मंदिराचे स्थान यामुळे या मंदिराच्या देखणेपणात भर पडली आहे. हे मंदिर अकराव्या शतकात बांधले गेले असावे, असे स्थानिक लोक सांगतात. या मंदिराचे संपूर्ण काम अत्यंत कलात्मक असे आहे. अनेक वर्षे भाविक श्रद्धेने या मंदिराला भेट देत असतात.

या मंदिराविषयी एक दंतकथा सांगितली जाते. कोणे एके काळी एक अरबी व्यापारी आपले गलबत घेऊन कोकण किनाऱ्यावरुन जात होता. सारे काही सुरळीत आहे असे वाटत असतानाच अकस्मात मोठे वादळ सुरु झाले. पाहता पाहता काही दिसेनासे झाले. या वादळात त्याचे गलबत कोठे भरकटले ते समजण्यास काहीच मार्ग नव्हता. या भरकटलेल्या जहाजाला थांबविण्यासाठी कोठे किनारा दिसतो का याचा तो व्यापारी शोध घेवू लागला. याच वेळी त्या प्रचंड वादळात त्याला लांबवर एक लुकलुकणारा दिवा दिसला. त्या दिव्याच्या दिशेने त्याने आपले गलबत महत्प्रयासाने हाकारले. घोंघावणाऱ्या वादळातही न विझता त्या व्यापाऱ्याला सुखरुप किनाऱ्यावर आणणारा तो दिवा म्हणजे शंकराच्या छोट्याशा मंदिरातील पणती होती. यामुळे कृतज्ञतेपोटी त्या व्यापाऱ्याने यानंतर या ठिकाणी मंदिराची उभारणी केली. मंदिराच्या बाजुलाच एक कबरही आहे. हिंदू-मुस्लिम ऐक्याचा हा एक आदर्श नमुना आहे.

कुणकेश्वराचे मंदीर कोकणात दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते. येथील शंकराची पिंड भव्यदिव्य असून ती निसर्गनिर्मित आहे, असे सांगितले जाते. श्रावणात दूरवरुन भाविक येथे दर्शनासाठी येतात. कोकण दौर्यात फिरताना सहजपणे कुणकेश्वराचे दर्शन अवश्य घ्या.




# नगरधनचा भुईकोट



विदर्भातील रामटेक हे धार्मिक स्थळ म्हणून प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रातील भाविकांबरोबर इतर राज्यांमधूनही अनेक भाविकांचा ओघ रामटेकला असतो. रामटेक पासून सहा-सात किलोमिटर अंतरावर एक बलदंड भुईकोट किल्ला आहे. हा किल्ला म्हणजे नगरधनचा किल्ला होय.

रामटेकच्या प्रसिद्ध अशा धार्मिक व पर्यटन स्थळाच्या जवळ असूनही नगरधनचा किल्ला मात्र अनेकांना अपरिचित आहे. रामटेकच्या डोंगरावरुन नगरधनचा किल्ला ओळखू येतो.

नगरधनचा किल्ला रामटेक तालुक्यात असून नागपूर जिल्ह्यामध्ये आहे. नागपूर ते जबलपूर असा राष्ट्रीय महामार्ग आहे. हा महामार्ग क्र. ७ आहे. या महामार्गावर मनसर हे गाव आहे. या मनसर गावातून पश्चिमेकडे रामटेककडे जाण्यासाठी किंवा तुमसर (जि. भंडारा) कडे जाण्यासाठी रस्ता फुटतो. या रस्त्याने रामटेक गाठल्यावर तेथून सहा-सात किलोमिटर दक्षिणेकडे नगरधन गाव गाहे.

नगरधन गावाच्या बाहेर (गाव ओलांडल्यावर) नगरधनचा किल्ला आहे. नागपूरपासून वाहनाने दिडतासात आपण नगरधन पर्यंत पोहोचू शकतो. नगरधन हे पूर्वी 'नंदीवर्धन' या नावाने परिचित होते असे काही संशोधकांचे मत आहे.

नगरधनचा भुईकोट हा प्रथमदर्शनी आपल्याला मोहवून टाकतो. नगरधन किल्ल्याने कात टाकून नवे रुप धारण केलेले आहे. याची तटबंदी व आतील भाग नव्याने दुरुस्त केलेला आहे. लालसर पण काळ्यारंगाची झाक असलेल्या चिऱ्यांनी किल्ल्याची तटबंदी व दरवाजा बांधून काढल्यामुळे त्याचे सौंदर्य कैकपटींनी वाढलेले आहे.

नगरधनच्या भव्य दरवाजावर काही शिल्पे अंलकृत केलेली आहेत. शिरोभागी गणेशाची प्रतिमा आहे. दोन्ही बाजूंना चषक कोरलेले आहेत. दाराच्या बाजूला द्वारपाल कोरलेले असून त्यांच्या खांद्यावर कबुतर दाखवले आहे. पुर्वी निरोपानिरोपी करण्यासाठी कबुतरांचा वापर करीत असत. दाराच्या आत पहारेकऱ्यांच्या देवड्या आहेत. पुर्वी आत येणाऱ्यांची चौकशी व झाडाझडती येथेच घेतली जायची.

दारातून आत शिरल्यावर तटबंदीवर जाण्यासाठी पायऱ्यांचा मार्ग केलेला आहे. तटबंदीवर चढल्यावर आपण तटबंदीवरुन फेरी मारु शकतो. या रुंद तटबंदीवर निरीक्षणासाठी मनोरे केलेले आहेत. येथून रामटेक किल्ल्याचे दर्शन उत्तम होते. किल्ल्याच्या आत वाड्याचे तसेच इतर निवासस्थानांचे अवशेष आहेत. किल्ल्यामध्ये तीन मजली खोल विहीर आहे. या मजल्यावर कमानीयुक्त खोल्या असून पायऱ्या उतरुन तिथपर्यंत पोहोचता येते. किल्ल्यामध्ये मंदिर, तसेच काही ठिकाणी प्राचीन अवशेषही पहायला मिळतात. नगरधनचा किल्ला हा वाकाटक कालीन असल्याचे मानले जाते. म्हणजे साधारण चवथ्या शतकातील किल्ला असावा. जुन्या आणि नव्याचा संगम असलेला नगरधनचा भुईकोट आटोपशीर आकाराचा असल्यामुळे तो पहाण्यासाठी एखादा तास आपल्याला पुरतो. नगरधनच्या भेटीत आपण रामटेकचा किल्ला व तेथेच नव्याने उभारलेले देखणे असे कालीदासाचे स्मारक ही पाहू शकतो. आपण पूर्व नियोजन व्यवस्थित केल्यास या भेटीतच तोतलाडोहचे अभयारण्यही पाहता येवू शकते.

# कासा किल्ला

कासा उर्फ पद्मदुर्ग हा जलदुर्ग आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला कासा किल्ला मुरुड गावा जवळील समुद्रात आहे. मुरुड हे गाव तालुक्याचे असून ते रायगड जिल्ह्यामध्ये आहे. मुरुड हे जंजिरा या जलदुर्गामुळे प्रसिध्दच आहे. या मुरुड गावाजवळ जंजिरा, सामराजगड आणि कासा उर्फ पद्मदुर्ग असे किल्ले आहेत.

मुरुडला जाण्यासाठी अलिबाग रेवदंडा मुरुड असा एक गाडी मार्ग आहे. मुंबई-पणजी महामार्गावरील नागोठणे अथवा कोलाड येथून रोहे गाठावे रोह-चणेरे बिरवाडी मार्गे मुरुडला जाता येते. तसेच मुंबई-पणजी महामार्गावरील इंदापूर येथून तळा-भालगाव मार्गेही मुरुड गाठता येते.

मुरुड गावातून राजपुरीकडे जाणारा गाडी रस्ता आहे. या रस्त्यावरच्या खाडीलगत एकदरा गाव आहे. याच्या किनाऱ्यावर अनेक मच्छीमारी नावा उभ्या असतात. या मच्छीमारी नौकावाल्याकडे चौकशी केल्यास यातील एखादी नौका आपल्याला कासा किल्ल्याकडे घेवून जावू शकते आपण संख्येने जास्त असल्यास फारसा आर्थिक भार पडत नाही. सागराची आणि हवामानाची परिस्थिती पाहूनच हे मच्छीमार कासाकडे येण्यासाठी तयार होतात. आपण आगावू चौकशी करुन किंवा आदल्या दिवशी जर नौका ठरवली तर वेळेची बचत होऊन गैरसोय टळू शकते.

जवळ असलेल्या जंजिरा किल्ल्याच्या सहाय्याने सिद्दी अतिशय प्रबळ झाला होता. त्याच्या आरमारी सामर्थ्याने त्याने किनारपट्टीवर धाक जमवला होता. सामान्य रयतेची पिळवणूक होत होती. त्यामुळे सिद्दीच्या अत्याचाराला पायबंद घालण्यासाठी शिवाजी राजांनी मुरुडच्या सागरात असलेल्या कासवाच्या आकाराच्या बेटावर किल्ला बांधण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार कासा उर्फ पद्मदुर्ग हा जलदुर्ग बांधला. त्याबद्दल महाराजांनी उद्गार काढले, पद्मदुर्ग वसवून राजापुरीच्या (जंजिरा) उरावरी दुसरी राजापुरी उभी केली आहे. कासा किल्ल्यामुळे जंजिऱ्याच्या सिद्दीला चांगलाच पायबंद बसला.

एकदण्यापासून किंवा राजापूरीपासून नावेने तासाभरात आपण कासा किल्ल्याला पोहोचतो. कासा किल्ल्याचे दोन भाग आहेत. एक मुख्य किल्ला आणि त्यासमोरील पडकोट. पडकोट मोठ्या प्रमाणावर नामशेष होत आला आहे परंतु मुख्य किल्ल्याची तटबंदी मात्र अजूनही उत्तमपैकी शाबूत आहे. मुख्य दारासमोरील मोठा बुरुज तग धरुन उभा आहे. या बुरुजाच्या चर्चा कमळाच्या पाकळ्याप्रमाणे फुललेल्या आकाराच्या आहेत. म्हणूनच याला पद्मदुर्ग असे नाव दिले गेले असावे. कासा उर्फ पद्मदुर्ग किल्ल्याच्या बांधकामाचे एक वैशिष्ठ येथे पहावयाला मिळते. तटबंदीच्या दोन दगडांमधे सिमेंटिंग म्हणून चुना वापरलेला आह. गेल्या साडेतीनशे वर्षामधे सागराच्या लाटांच्या तडाख्याने आणि खाऱ्या पाण्यामुळे तटबंदीचा दगड झिजून गेला आहे. या दगडाची झीज पाच ते दहा से.मी.एवढी झाली आहे. तरीही दोन दगडांमधला चुना अजूनही शाबूत आहे. शिवकालीन बांधकामाचे हे वैशिष्ट्य आपल्याला चकित करते. पडकोटामधील चौकोनी विहीर, तोफा, इमारतींचे अवशेष असे पाहून आपण मुख्य किल्ल्याकडे निघायचे पडकोट आणि मुख्य किल्ला या मधील खडकावर समुद्रामधून वाहून आलेल्या शंख शिंपल्यांचा ढीग साचलेला आहे.

कासा किल्ल्याच्या महाव्दारामधे प्रवेश करण्यासाठी चार पाच पायऱ्या चढाव्या लागतात. दाराच्या आतल्या बाजूला पहारेकऱ्याच्यासाठी केलेल्या देवड्या आहेत. किल्ल्याच्या तटावर जाण्यासाठी पायऱ्यांचा मार्गही आहे. मधल्या भागामधे नव्या जुन्या वास्तूंचे अवशेष पहायला मिळतात. काही काळ भारतातील कस्टम ऑफिसचे एक कार्यालय येथे थाटलेले होते. हे चौकीवजा कार्यालय येथून हलल्यावर या सगळ्या वास्तूचा ताबा निसर्गाकडे आला त्यामुळे सगळ्या वास्तूंची रयाच गेलेली दिसते. चारही बाजुंनी खारे पाणी असताना आतमधे गोड्या पाण्याची चार टाकी केलेली दिसतात. किल्ल्याचा दर्या दरवाजा आणि त्याचे स्थापत्य पाहून परत फिरायचे. तटबंदीवरुन जंजिरा आणि सामराजगड किल्ले दिसतात. मुरुडचा किनाराही उत्तम दिसतो.



# घोसाळगड उर्फ वीरगड

घोसाळगड उर्फ वीरगड हा किल्ला रायगड जिल्ह्यामधे आहे. दुर्गसंपन्न असलेल्या कोकणातील रायगड जिल्ह्यामधे रोहे तालुका आहे. रोहे तालुक्यात घोसाळगडाचा किल्ला आहे.

मुंबई-पुणे या महानगरांशी रोहे हे गाडीमार्गाने जोडले गेले आहे. शिवकालापासून प्रसिध्द असलेले रोहे गाव कुंडलिका नदीच्या दक्षिण तीरावर वसलेले आहे. मुंबई - पणजी महामार्गाच्या पश्चिमेकडे असलेल्या रोहे येथे जाण्यासाठी महामार्गावरील नागोठेणे तसेच कोलाड येथून फाटे आहेत. तसेच रोहे हे कोकण रेल्वेवरील महत्त्वाचे रेल्वे स्थानकही आहे.



रोहे येथून मुरुड या सागरकिनाऱ्यावरील गावाला जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. त्यापैकी एक चणेरे - बिरवाडी कडून कुंडलिका नदीच्या किनाऱ्याने जातो. तसेच दुसरा मार्ग घोसाळगडाकडून भालगाव मार्गे जातो. याच मार्गावर घोसाळगडाचा किल्ला आहे. चारही बाजुंना लहान मोठ्या डोंगरांच्या मधे घोसाळगड विराजमान झालेला आहे. समुद्र सपाटीपासून २६० मीटर उंच असलेल्या घोसाळगडाचा आकार दूरुन शिवलिंगासारखा भासतो.

रोहे एस.टी. स्थानकावरून घोसाळगडाला जाण्यासाठी एस.टी.बसेसची सोय आहे. साधारण तासाभरात आपण घोसाळगड गावात पोहोचतो. गडाच्या पायथ्याला घोसाळगड गाव आहे.

गावातूनच गडावर जाणारा रस्ता आहे. रस्ता संपल्यावर पायऱ्यांचा मार्ग केलेला आहे. या पायऱ्यांच्या मार्गावर भवानी मातेचे मंदिर असून त्यापुढे गणपतीचे प्रशस्त मंदिर आहे. मंदिरामधील गणेशमुर्ती स्वयंभु आहे. गणेशाला वंदन करुन चढाई सुरु करायची पंधरावीस मिनिटांमधे आपण गडाच्या तटबंदीजवळ येवून पोहोचतो. कातळात कोरलेल्या पायऱ्या समोर दिसतात. यातील काही पायऱ्या तोफांच्या माऱ्यामुळे ध्वस्त झालेल्या आहेत. या पायऱ्यांवरुन वर पोहोचल्यावर मधेच काही चांगल्या पायऱ्या लागतात. या पायऱ्या आपल्याला दरवाजा पर्यंत घेऊन जातात. मात्र येथिल प्रवेशव्दार पुर्णतः नष्ट झालेले आहे. त्याचे अवशेष येथे विखूरलेले आहेत. या अवशेषांमधे वाघांची चित्रे कोरलेले दगडही पहायला मिळतात. येथून थोडे वर दारुगोळ्याचे कोठार म्हणून जागा आहे. येथून पुढे गेल्यावर गडाचे दोन भाग पडतात. एक माचीकडील तर दुसरा बालेकिल्ल्याकडील अरुंद असलेल्या डोंगर सोंडेवर तटबंदी बांधून ही माची तयार केलेली आहे. तटबंदीवर चढण्यासाठी पायऱ्या आहेत. या तटबंदीमधे त्याकाळातील शौचकूप पहायला मिळतात. माचीच्या टोकावर पुर्वी एक तोफ पडलेली होती.

माचीपाहून आपण बालेकिल्ल्याकडे प्रस्थान करायचे बालेकिल्ल्याच्या उंचवटयावर पाण्याच्या कोरीव टाक्या, घरांचे अवशेष, माथ्यावर किल्लेदाराचा वाडा असल्याच्या खुणा आढळतात.

गडाच्या माथ्यावरुन तळागडाचे दर्शन मनाला सुखवून जाते. कुडे मांदाडच्या खाडीचे दृष्य आपल्याला खिळवून ठेवते. शिवकालामधे स्वराज्यात असलेला घोसाळगड पुर्वी निजामशाही मधे होता. छत्रपती शिवाजी महाराज प्रतापगडाच्या समर प्रसंगात अडकलेले पाहून जंजिऱ्याच्या सिध्दीने घोसाळगडाला वेढा दिला होता पण अफझलखान मारला गेल्याचे कळाल्यावर सिध्दी वेढा उठवून पळून गेला. पुढे पुरंदरच्या तहात शिवाजी महाराजांनी घोसाळगड मोगलांना दिला नाही. तो आपल्याकडेच राखला. असा हा महत्त्वाचा किल्ला दुर्लक्षीत आहे. गडदर्शन करुन आल्यावाटेने उतरुन परतीचा मार्ग पकडता येईल. अथवा येथून चालत तीन तासांच्या पायपिटीनंतर बिरवाडीच्या किल्ल्याला जाता येते. बसने तळा किल्ला अथवा जंजिरा किल्ला ही गाठता येईल.

# अलप्पुझा

स्थान: अलप्पुझा समुद्र किनारा, अलप्पुझा शहराजवळ, दक्षिण केरळ

पूर्वेचे व्हेनिस म्हणून ओळखल्या जाणार्या अलप्पुझाने केरळच्या सागरी इतिहासात नेहमीच महत्वाचे स्थान भूषविले आहे, आज, ते नौका शर्यत, बॅकवॉटर सुट्ट्या, समुद्र किनारे, सागरी उत्पादने आणि कॉयर उद्योग यांसाठी प्रसिद्ध आहे. अलप्पुझा समुद्र किनारा हे एक लोकप्रिय सहलीचे ठिकाण आहे. इथल्या समुद्रात गेलेला खांब १३७ पेक्षा अधिक वर्ष जुना आहे. विजया बीच पार्कमधील मनोरंजनाच्या सुविधा समुद्रकिनार्यानच्या आकर्षणात भर घालतात. इथे जवळच एक जुने लाईटहाऊसही आहे जे पर्यटकांना आकर्षित करते.

अल्लप्पुझामध्ये असताना घ्यावयाचा अन्य आनंददायक अनुभव आहे हाऊस बोट क्रूझ. अल्लप्पुझाच्या बॅकवॉटरमध्ये तुम्हाला हाऊस बोट पहायला मिळतात त्या खरंतर जुन्या काळातल्या केट्टुवल्लमचे सुधारित रुप आहे. मूळ केट्टुवल्लम किंवा राईस बार्जेज कित्येक टन तांदूळ आणि मसाले वाहून नेत. केट्टुवलम किंवा 'गाठींची होडी' ला असे म्हणत कारण संपूर्ण होडी नारळाच्या दोरखंडांच्या साहाय्याने एकत्र बांधली जात असे. हल्लीच्या हाऊस बोट एका चांगल्या हॉटेलच्या सर्व सुविधांनी युक्त असतात, ज्यात सुसज्ज शयनकक्ष, आधुनिक शौचालय, आरामदायक बैठकीची खोली, स्वयंपाकघर आणि गळाने मासे पकडण्यासाठी गॅलरीही उपलब्ध असते आणि हाऊस बोट मध्ये रहात असताना तुम्ही बॅकवॉटर जीवनाच्या दृश्यांचा कोणत्याही अडथळ्याविना आनंद लुटू शकता.

**येथे पोहोचण्यासाठी: जवळचे रेल्वे स्थानक:** अलप्पुझा, समुद्रकिनार्या पासून अंदाजे ५ किमी **जवळचा विमानतळ:** कोचिन आंतरराष्ट्रीय विमानतळ, अलप्पुझा शहरापासून अंदाजे ८५ किमी.

